**युजीसी विद्वत्प्रमाणित पत्रिकांमध्ये प्रकाशित संशोधन प्रपत्र**

1. संगीत जयद्रथ विडंबन : एक आकलन, अक्षर वाङ्मय, वर्ष बारावे, अंक दुसरा, ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर 2021

2. पालशेतची विहीर : स्त्री वेदनेचा हुंकार, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक क्र. 377, जानेवारी-फेब्रुवारी-मार्च 2022

3. गोमंतकातील ग्रामीण नाट्यचळवळ आणि नाट्यग्रंथालये, पंचधारा ग्रंथालय विशेषांक, वर्ष 65 वे, अंक तिसरा आणि चौथा, ऑक्टोबर 2022 ते मार्च 2023

# अक्षर वाङ्मय

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२१
वर्ष : बारावे अंक : दुसरा



संपादक
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

आर. एन्. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN – 2229-4929
UGC Approved and
Peer Reviewed Journal

# अक्षर वाङ्मय

वर्ष : बारावे अंक : दुसरा

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२१

संपादक
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

कार्यकारी संपादक
डॉ. शिवाजीराव देशमुख

मार्गदर्शक
डॉ. अरुण प्रभुणे

संपादक मंडळ

डॉ. बाळासाहेब लबडे डॉ. दीपक चिद्दरवार
डॉ. रत्नाकर बेडगे डॉ. संदीप सांगळे

समन्वयक
रमेश देशपांडे, अमेरिका

समन्वयक
सोनाली जाभेकर, अमेरिका

प्रकाशक : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन,
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५.

मुद्रक : प्रिंटसेल्फ, १५४३ 'ओंकार कॉर्नर', नवी पेठ, पुणे-४११ ०३०

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** डॉ. नानासाहेब सूर्यवंशी
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, ता. अहमदपूर
जि. लातूर ४१३५१५. भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com.

**वार्षिक वर्गणी :** रु. ५००/- **द्विवार्षिक वर्गणी :** रु. ९००/-
**पंचवार्षिक वर्गणी :** रु.२०००/- **अंकाचे मूल्य :** रु. १२५/-

* महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

* या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

R. N. I. FOR INDIA New Delhi
R. No. – MAHMAR-36829-2010

ISSN – 2229-4929
UGC Approved and
Peer Reviewed Journal

# AKSHAR WANGMAY

**Year : 12 Volume : 2**
**October-November-December 2021**

Editor-in-Chief
**Dr. Nanasaheb Suryawanshi**

Executive Editor
**Dr. Shivajirao Deshmukh**

Advisor
**Dr. Arun Prabhune**

Editorial Board

**Dr. Balasaheb Labde**
**Dr. Ratnakar Bedge**
Coordinator
**Mr. Ramesh Deshpande (USA)**

**Dr. Deepak Chiddarwar**
**Dr. Sandeep Sangle**
Coordinator
**Sonali Jambhekar (USA)**

Publisher : Sou. Rekhatai Nanasaheb Suryawanshi, Pratik Prakashan, 'Pranav', Rukme Nagar, Thodga Road, Ahmedpur 413515
Printer : Printself, 1543, 'Omkar Corner' Navi Peth, Pune 411 030

**Address for sending articles and fees :** Dr. Nanasaheb Suryawanshi
'Pranav', Rukme Nagar, Thodga Road, Ahmedpur 413515
District : Latur
Mobile phone : 9423655841
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com

**Subscription Rates Yearly :** Rs. 500/-
**Five Years :** Rs. 2000/-
**Two years :** Rs. 900/-
**Current Volume :** Rs. 125/-

* Maharashtra State Literary and Cultural Board has granted funds for the Publication of this Journal. But Maharashtra State Literary and Cultural Board has not been responsible for writers opinion in this Journal.
* The content and opinions expressed in the articles are the views of the authors and do not necessarily reflect the views and opinions of the periodical's Editorial Board, publisher or the advisor. The authors are solely responsible for the facts and accuracy of the content of the articles.

## अनुक्रम

- संपादकीय ---------------------------------------- ५
- मुखपृष्ठाविषयी ---------------------------------------- ७
- 'संगीत जयद्रथ विडंबन'- एक आकलन ---------------- ३३
  **प्रा. चिन्मय मधू घैसास**
- भारतीय साहित्य संशोधनाच्या नव्या दिशा ---------------- ४१
  **डॉ. संजय कोळी**
- मराठी-कन्नड साहित्य संबंध ---------------------- ४६
  **डॉ. चंद्रकांत वाघमारे**
- आदिवासी साहित्य, संस्कृती आणि कला ---------------- ५१
  **डॉ. एस. डी. लांडे**
- कवी काळसेकर ---------------------------------- ५५
  **प्रा. इंद्रजित भालेराव**
- लेखकाचे घर- नरहर कुरुंदकर ---------------------- ६६
  **डॉ. ऊर्मिला चाकूरकर**
- आठवणीतले बाबा -------------------------------- ७५
  **तेजस्विनी देव**
- 'आठवणी' नरहर कुरुंदकर ------------------------ ९२
  **डॉ. बाळकृष्ण कवठेकर**
- जावे त्यांच्या वंशा ------------------------------ १०३
  **सावित्री जगदाळे**
- 'आस्तिक' : मिथककथा आणि गांधीवादी विचारांचे प्रतिबिंब --- १११
  **डॉ. दिनेश वाघुंबरे**

❒ संकल्पाची सिद्धी : 'वादळवाटा' ------------------- १२३
डॉ. विद्यासागर पाटंगणकर

❒ मराठी साहित्यातील समाजवास्तवाचे आशयाशी असणारे अनुबंध - १२७
डॉ. नानासाहेब पवार

❒ 'पुढल्या हाका' : एक मानसशास्त्रीय दृष्टिकोन ------------ १३६
डॉ. प्रकाश शेवाळे

❒ 'स्त्री जाणीवा आणि स्त्री संवेदना' : एक अभ्यास-
नवा आश्वासक समीक्षा ग्रंथ ---------------------- १४१
प्रा. अरुण ठोके

❒ कविता ----------------------------------- १४५
विलास वैद्य, सुनीता धारवाडकर, डी. बी. जगत्पुरिया

❒ 'अक्षर वाङ्मय' चे नूतन व नूतनीकरण केलेले वर्गणीदार ------ १५०

❒ संपादक मंडळ ------------------------------ १५२

'अक्षर वाङ्मय' ची वर्गणी मनीऑर्डर / धनादेश /धनाकर्ष संपादक 'अक्षर वाङ्मय' या नावे किंवा मेल ट्रान्सफरने वर्गणी जमा करावयाची असल्यास भारतीय स्टेट बँक शाखा, अहमदपूर, जि. लातूर येथे जमा करावी.

**खाते:** संपादक 'अक्षर वाङ्मय' खाते क्र. ३६८३२८४६७५६

IFSC बँक क्र. SBIN - 0020041 या बँकेतील

अक्षर वाङ्मय खाते क्र. ३६८३२८४६७५६

वार्षिक वर्गणी रु. ५००/-

द्विवार्षिक वर्गणी रु. ९००/-

पंचवार्षिक वर्गणी रु. २०००/-

गुगल पे नं.- ९४२३६५५८४१

# संपादकीय

'अक्षर वाङ्मय'चा बाराव्या वर्षातला दुसरा अंक नियत वेळी आपल्या हाती देताना आनंद होत आहे.

'मुखपृष्ठाविषयी....' हा मुखपृष्ठ लेख, समीक्षा, लोकसाहित्य, ललित लेख, 'लेखकाचे घर' या लेखमालेतील पुढचा लेख, परीक्षणे आणि कविता अशा विविध प्रकारच्या लेखनाने समृद्ध असलेला सदर अंक आहे.

आज सर्वांत प्राचीन मानल्या जात असलेल्या इतिहासपूर्वकालीन आद्य हाडबासरीच्या छायाचित्राने या अंकाचे मुखपृष्ठ सजवले गेले आहे. मुखपृष्ठावरील अर्थपूर्ण छायाचित्राचे मर्म उलगडणारा 'मुखपृष्ठाविषयी....' हा मुखपृष्ठ लेख श्राव्य कलेशी संबंधित असलेला आहे. मानवाने बासरी या सुषिर वाद्याचे अनुभवांती केलेले संशोधन हे श्राव्य कलेत केले गेलेले पहिले संशोधन असावे असे आज मानले जाते. या आद्य श्राव्य कलेच्या निर्मितीच्या उत्क्रांतीचे ऐतिहासिक टप्पे या लेखात अधोरेखित केले आहेत. बासरीनिर्मितीशी संबंधित असलेल्या दोन अनुवादकथा– ग्रीक पुराणकथा आणि अमेरिकेतल्या मूळ राहिवाशांची दंतकथा– यांचा आस्वादही आपण या लेखात घेऊ शकणार आहात.

सुरुवातीच्या काही मोजक्या स्त्री नाटककारांपैकी हिराबाई पेडणेकर हे एक नाव. 'संगीत जयद्रथ विडंबन' हे हिराबाई पेडणेकर यांचे १०७ वर्षांपूर्वीचे नाटक. हे नाटक व नाटककार दोन्ही काही काळ दुर्लक्षित केले गेलेले. ऐतिहासिक मूल्य असलेल्या अशा नाटकाची परिचयवजा समीक्षा प्रा. घैसास यांनी केली आहे. नाटक आणि नाटकाच्या पहिल्या प्रयोगाविषयीची माहिती तसेच रंगकर्मींची नामावली लेखाच्या शेवटी दिली आहे. हे दस्तावेजीकरण नाट्याभ्यासकांच्या व संशोधकांच्या दृष्टीने महत्त्वाचे असून संग्राह्यही आहे.

मराठी–कानडी साहित्यिकांचा विचार करणारा डॉ. चंद्रकांत वाघमारे यांचा लेख, तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व अधोरेखित करणारा डॉ. संजय कोळी यांचा लेख, आदिवासी साहित्य, संस्कृती व कला या वरील डॉ. लांडे यांचा लेख आणि इंद्रजित भालेराव यांचा सतीश काळसेकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणारा ललित लेख वाचनीय आहेत.

कै. नरहर कुरुंदकरांविषयी तीन लेख सदर अंकात आपल्याला वाचायला मिळणार आहेत. त्यांच्या सुविद्य कन्या तेजस्विनी देव यांचा वडिलांच्या कौटुंबिक

व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणारा ललित लेखही वाचनीय आहे. बाळकृष्ण कवठेकरांचे अभ्यासू समीक्षकव्यक्तिमत्त्व कुरुंदकरांना कसे भावले आणि कुरुंदकरांशी आलेल्या सहवासातून कुरुंदकरांच्या व्यासंगी व सहृदय व्यक्तिमत्त्वाचे काही पैलू बाळकृष्ण कवठेकरांना प्रसंगोपात्त कसे उमगत गेले याचे प्रत्ययकारी दर्शन कवठेकरांच्या लेखातून घडवले गेले आहे. हे दोन्ही लेख डॉ. ऊर्मिला चाकुरकरांच्या 'लेखकाचे घर' या लेखमालेतील नरहर कुरुंदकरांच्या संदर्भातील लेखाला अधिक अर्थपूर्णता मिळवून देणारे आहेत.

सावित्री जगदाळे यांचा 'जावे त्यांच्या वंशा' हा लेख विशेष लक्षणीय आहे. जगदाळे यांची माहेर आणि सासरची कुटुंबे मुळातील ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबे. पतीच्या निवृत्तीनंतर शेतीची मूळ आवड जोपासण्याची इच्छा झाल्याने शेती करण्याचा त्या प्रयत्न करतात. पण शेतीविषयक आज्ञानापोटी त्यांचा फजितवडा होत राहतो. हा फजितवडा वाचताना रंजक वाटत असला तरी हा ललित लेख विचाराला एक नवी दिशा देणारा आहे असे वाटेल.

अनेक ग्रामीण शेतकरी कुटुंबे आज शहरी गृहस्थी जीवनशैलीची बनली. म्हणून मनात शेतीची ओढ असली तरी ते 'ग्रामीण कष्टकरी शेतकरी' राहिले नाहीत. शहरी हौशी नवशेतकऱ्यातील आणि तहहयात नोकरदार असलेल्या पण मूळचे शेतकरी असलेल्यातील भेद कमी झाला. जगदाळे यांचा ललित लेख वाचून याचे प्रत्यंतर येते. ज्या हळुवार मर्म विनोदाच्या आश्रयाने जगदाळे यांनी स्वत: कसे हास्यास्पद बनत गेलो याचे लालित्यपूर्ण वर्णन केले आहे ते मराठीत अभावानेच आले आहे असे वाटते.

कृषिकुळातील कृषकाचा हा कृषिविषयक जीवनानुभव एका अर्थी वेगळ्या प्रकारचे 'नव ग्रामीण साहित्य' आहे असे म्हणता येऊ शकेल. आजवरच्या ग्रामीण साहित्यातील 'ग्रामीण संवेदनशीलते'पेक्षा ही संवेदनशीलता अ-पूर्व स्वरूपाची आहे. एका नव्या संवेदनशीलतेने ग्रामीण कृषिजीवनाला सामोरे जाणारे शेतकरी स्त्रीमन इथे आहे. ही स्त्री शहरी व हौशी शेतकरी नाही. मूळची शेतकरी असल्याने या स्वअनुभव कथनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. नवा आयाम मिळालेला ग्रामीण अनुभव चित्रित केला गेला असल्याने जणू ग्रामीण साहित्याला नवा आयाम मिळाला आहे असे म्हणावे वाटते. मूळच्या कृषिनिष्ठाचे हे बदललेले भावविश्व म्हणूनच अ-पूर्व वाटणारे आहे.

या प्रकारे 'अक्षर वाङ्मय'चा हा अंक अनेक वैशिष्ट्यपूर्ण लेखांनी युक्त असून संदर्भमूल्य असणारा आहे.

**– संपादक**

# 'संगीत जयद्रथ विडंबन' - एक आकलन

– प्रा. चिन्मय मधु घैसास

मराठी संगीत रंगभूमीने आजवर अनेक दिग्गज नाटककार, संगीतकार, गायक कलाकार, तंत्रज्ञ रंगभूमीला दिले आहेत. रसिकांचे मनोरंजन करण्याबरोबरच विविध विषयांवर भाष्य करण्याचे महत्त्वाचे कार्य संगीत नाटकाने केले आहे. लोकांची शास्त्रीय संगीताची आवड आणि रुची नाट्यसंगीताच्या रूपात संगीत नाटकाने पूर्ण केली आहे. विष्णुदास भावे यांनी ५ नोव्हेंबर १८४३ या दिवशी 'सीतास्वयंवर' या नाटकाचा पहिला प्रयोग सांगली येथे सादर केला. त्यानंतर १८८० साली अण्णासाहेब किर्लोस्करांच्या 'संगीत शाकुंतल' पासून व्यापक अर्थाने संगीत नाटकांची परंपरा सुरू झाली. या परंपरेतील अनेक नामवंत नाटककारांनी परंपरा समृद्ध केली आहे. मोजक्या परंतु उल्लेखनीय कार्य केलेल्या काही महिला नाटककारांचाही या परंपरेत महत्त्वाचा वाटा आहे. यातीलच एक म्हणजे हिराबाई पेडणेकर.

आद्य महिला नाटककार म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो त्या हिराबाई पेडणेकरांनी आपल्या नाट्यकला कारकीर्दीत दोन संगीत नाटके लिहिल्याचा उल्लेख सापडतो. 'संगीत जयद्रथ विडंबन'आणि 'संगीत दामिनी' ही दोन नाटके हिराबाई पेडणेकर यांनी लिहिली आहेत. पैकी दुसरे नाटक संगीत दामिनी हे १९०८ साली रंगमंचावर सादर झाले आणि कालांतराने १९१२ साली ते पुस्तकरूपाने प्रकाशितही झाले परंतु 'संगीत जयद्रथ विडंबन' हे १९०३ साली लिहून १९०४ साली प्रकाशित झाले असले तरी प्रकाशनानंतर त्याचा रंगमंचावर प्रयोग झाला नाही. या नाटकाचा पहिला प्रयोग तब्बल ११६ वर्षांनंतर दि. २४ डिसेंबर २०२० रोजी गोव्यातील फोंडा शहरात राजीव गांधी कला मंदिरात संपन्न झाला. या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाद्वारे हिराबाईंचे संगीत नाटक क्षेत्रातील कार्य, त्यांचे नाट्यलेखन, त्यांची नाट्यलेखनप्रतिभा या सर्व गुणांचा परिचय

पुन्हा एकदा नव्याने झाला. संगीत नाटक या क्षेत्रात कार्य आणि संशोधन करणाऱ्या सर्वांसाठी हे नाटक एक महत्त्वाचा संदर्भ ठरते.

'संगीत जयद्रथ विडंबन' या नाटकाचे कथानक महाभारतातील एका घटनेवर आधारित आहे. द्यूतात हरल्यानंतर पांडवांना वनवासात जावे लागते. वनवासाच्या दरम्यान पांडवांचे वास्तव्य काही काळ धौम्य ऋषींच्या आश्रमात असते. आश्रमात पांडव आणि द्रौपदी सुखात असतानाच एके दिवशी त्या परिसरातून जयद्रथ, आपला मित्र कोटीक याच्यासमवेत जात असतो. त्याच वेळी, धौम्य ऋषींच्या आश्रमाकडे त्याची नजर जाते आणि आश्रमाच्या परिसरातील एक सुंदर स्त्री त्याच्या नजरेस भरते आणि तिला प्राप्त करण्याची अनावर इच्छा त्याच्या मनात निर्माण होते. त्या स्त्रीचा संपूर्ण तपशील घेऊन येण्यास तो कोटिकाला सांगतो. कोटिकाकडून त्याला समजते की ही स्त्री दुसरी तिसरी कुणी नसून ती द्रौपदी आहे. तरी देखील, तिला प्राप्त करीनच असा निर्धार जयद्रथ करतो. द्रौपदी ही पांडवांची पत्नी आहे त्यामुळे तिचा नाद सोडून द्यावा, असे कोटिकाने समजावून देखील जयद्रथ हट्टाला पेटतो आणि स्वत:च धौम्य ऋषींच्या आश्रमात दाखल होऊन बळजबरीने द्रौपदीला घेऊन जाण्याचा प्रयत्न करतो. धौम्य ऋषी, आश्रमीय तसेच खुद्द द्रौपदीच्या विरोधाला आणि प्रतिकाराला न जुमानता जयद्रथ तिला घेऊन जातो. हा प्रसंग घडत असताना पांडव आश्रमात नसतात. काही वेळाने ते आश्रमात आल्यावर त्यांना सगळा प्रकार कळतो आणि ताबडतोब ते जयद्रथाच्या दिशेने मार्गक्रमण करून, त्याच्याशी युद्ध करून द्रौपदीला मुक्त करून घेऊन येतात.

वास्तविक, प्रस्तुत नाटकाचे कथानक अगदी आटोपशीर आणि सुटसुटीत आहे. पारंपरिक संगीत नाटकांप्रमाणे त्यात अतिव्याप्ती दिसून येत नाही. एका छोट्याशा घटनेवर लक्ष केंद्रित करून त्यातून संगीत नाटक मांडण्याचा प्रयत्न हिराबाई पेडणेकरांनी केलेला दिसतो. नाटकाचे कथानक तीन अंकात उत्तम प्रकारे मांडण्यात आलेले आहे. नाटकाचे कथानक जरी महाभारतातील घटनेवर आधारित असले तरी त्याचा आधार घेत हिराबाईंनी आपल्या जीवनाचे प्रतिबिंब त्यात उमटवण्याचा प्रयत्न केलेला स्पष्टपणे दिसून येतो. कथानकाच्या ओघात येणारी विविध पात्रे, त्यांचे संवाद, घटनाप्रसंग यांच्याद्वारे आपल्या जीवनातील सत्य परिस्थिती मांडण्याचा प्रयत्न हिराबाईंनी केलेला आहे असे म्हणता येते.

'आद्य महिला नाटककार हिराबाई पेडणेकर' हे हिराबाईंचे चरित्र सौ. शिल्पा सुर्वे यांनी लिहिले आहे. त्यात त्यांनी हिराबाईंच्या जीवनातील घटनाप्रसंगांचा उल्लेख केला आहे. त्यांचा या नाटकाच्या कथानकाच्या संदर्भात विचार करता असे स्पष्टपणे दिसून येते की हे नाटक म्हणजे हिराबाईंनी बहुतांशी आपल्या जीवनाची कहाणीच मांडण्याचा प्रयत्न आहे. पुरुषानेही स्त्रीवर अव्यभिचारी, अचल प्रेम करायला हवे. स्त्रीनिष्ठा अपेक्षिणाऱ्या पुरुषांच्या दुटप्पी आणि दांभिकतेचा निषेध करावा तितका थोडाच. प्रेमाच्या साम्राज्यात स्त्री-पुरुष समान हवेत, हे हिराबाईंचे वाक्य या चरित्रात आढळते. हिराबाईंना तत्कालीन समाजाकडून कोणत्या प्रकारची अवहेलना आणि मानहानी सोसावी लागली असेल याचा अंदाज या चरित्रात जसा दिसून येतो तसाच स्त्री-पुरुष यांच्यासंबंधीचे हिराबाईंचे विचारही या चरित्रात सापडतात. 'नायकीण समाजातील स्त्रीने उच्चवर्णीयांच्या पंक्तीत बसून नाटक लिहावे हे तत्कालीन कर्मठ समाजाला पेलणारे नव्हते' हे शिल्पा सुर्वे यांचे विधान हिराबाईंच्या जीवनातील खडतर प्रसंगांची कल्पना देते.

१८८५ साली जन्मलेल्या हिराबाईंनी १९०३ साली (वयाच्या १८ व्या वर्षी) हे नाटक लिहिले आणि १९०४ साली ते प्रकाशित झाले. नाटकातील द्रौपदी या प्रमुख पात्राच्या माध्यमातून हिराबाईंनी मांडलेली स्वत:च्या जीवनाची कहाणी लक्षवेधी आहे. द्यूत म्हणजे एकप्रकारे मानवी जीवनच आहे, ज्यामध्ये माणूस क्षणोक्षणी काही ना काही पणाला लावत असतो आणि अशा या द्युतात जेव्हा माणसाचा पराभव होतो तेव्हा ती एक विदारक अवहेलना असते. अशीच अवहेलना स्वत:च्या वाट्याला आली होती हे हिराबाईंनी या नाटकाची केंद्रवर्ती संकल्पना निवडताना दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. अशी अवहेलना पुरुषांच्या नव्हे तर स्त्रियांच्याच वाट्याला अधिक येत असते आणि त्यातही तत्कालीन नायकीण समजातील स्त्रियांचे जे दु:ख होते त्याचे प्रतीक म्हणून हिराबाईंनी द्रौपदी या पात्राची मांडणी केलेली दिसून येते.

'इयत्ता सातवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या हिराबाईंनी समाज-भगिनींपुढे शिक्षणाचा आदर्श ठेवला. देवदासी मुलींनी ज्ञानार्जन करून आत्मनिर्भर व्हावे, वेश्या व्यवसाय सोडून लग्नं करावीत, असे त्यांना वाटायचे' असे शिल्पा सुर्वे यांनी हिराबाईंच्या चरित्रात नमूद केले आहे. याच विधानाचा विचार करता,

प्रस्तुत नाटकातील जयद्रथ या पात्राचा संदर्भ इथे मार्मिक ठरतो. जयद्रथ या पात्राच्या माध्यमातून तत्कालीन समाजातील पुरुषी भोगवादी आणि शोषक मनोवृत्ती हिराबाईंनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. भोगाची वस्तू असा स्त्रीविषयी संकुचित आणि बुरसटलेला विचार करणार्या समाजवृत्तीवर ताशेरे ओढण्याचा प्रयत्न हिराबाईंनी केलेला दिसतो.

जयद्रथाचा मित्र कोटिक हे पात्रही या घटना-प्रसंगात महत्त्वाचे आहे. द्रौपदीवर वाईट नजर ठेवणार्या जयद्रथाला कोटिक हरतऱ्हेने समजावण्याचा प्रयत्न करतो परंतु त्याच्या हट्टापुढे कोटिकाचा नाईलाज होतो. चुकीच्या मार्गाने जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आपल्या माणसाला अनेकदा जवळची माणसे समजावण्याचा प्रयत्न करीत असतात परंतु त्या व्यक्तीच्या हट्टापुढे झुकून अनेकदा त्या व्यक्तीच्या वामकृत्याला समर्थन देण्यास बळी पडतात. अशा माणसांनी त्या प्रसंगी कणखर राहून चुकीच्या माणसांना वाईट कृत्य करण्यापासून रोखले तर समाज अनेक पटींनी अधिक सुरक्षित, समृद्ध होईल असा विचार या निमित्ताने हिराबाईंनी मांडलेला आहे. योग्य आणि अयोग्य, न्याय आणि अन्याय यांचे भान ठेवून सत्याची कास धरण्याचा विचार हिराबाई या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून देतात. अनेकदा सत्तेच्या, अधिकाराच्या लोभापायीदेखील अनेक माणसे नीतीचा पक्ष सोडून अनीतीच्या बाजूने उभी राहतात हाही महत्त्वाचा विचार या पात्राच्या माध्यमातून मांडलेला आहे.

जयद्रथ हे पात्र समाजातील शोषक वृत्तीचे आणि शोषणकर्त्यांचे ज्वलंत उदाहरण म्हणून पाहता येते. जयद्रथाकडून द्रौपदीच्या विडंबनाचा झालेला प्रयत्न म्हणजे समाजाकडून झालेले आपले शोषण, समाजाकडून मिळालेला त्रास ही आपल्या जीवनाची सत्यकहाणी हिराबाई मांडण्याचा प्रयत्न करतात. कोणत्याही प्रकारची प्रतिष्ठा कधीच न मिळाल्याने आणि सदैव अवहेलनाच वाट्याला आल्यामुळे सन्मानाने जीवन जगण्याची स्वत:ची जी इच्छा अपूर्ण राहिली त्याचे चित्रण हिराबाई या नाटकात द्रौपदी, जयद्रथ या पात्रांच्या तसेच संबंधित घटनाप्रसंगांच्या माध्यमातून करतात.

जयद्रथाकडून विडंबनाचा प्रयत्न होत असता, द्रौपदीने आटोकाट प्रतिकार करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. द्रौपदी या पात्राच्या आधारे तत्कालीन स्त्रियांची आणि पर्यायाने स्वत:ची हतबलता, असहायता हिराबाई मांडतात. समाजाकडून

कोणताही आधार न मिळणे, कायम संघर्ष करावा लागणे आणि कर्तृत्व सिद्ध करूनही त्याची दखल घेतली न जाणे या, स्वजीवनातील, विदारक सत्याचे प्रतिबिंब द्रौपदी या पात्राच्या माध्यमातून करण्यात आलेले दिसते. धौम्य ऋषींचा आश्रम आणि तेथील प्रेमळ आश्रमीय ही पात्रे जशी द्रौपदीच्या रुक्ष, भगभगीत जीवनात मायेचा ओलावा घेऊन येतात तशाच काही अपवादात्मक सुहृद व्यक्ती आपल्याला जीवनात लाभत असतात आणि त्याच मोजक्या व्यक्तींच्या मायेच्या आधाराने आपण जीवनातील दु:खाला सामोरे जात असतो हा विचार या पात्रांच्या माध्यमातून समोर येतो.

द्रौपदीचे अपहरण, विडंबन झाल्याचे कळताच पांडवांनी केलेला प्रतिकार आणि जयद्रथाच्या तावडीतून द्रौपदीची केलेली सुटका यावरून कुटुंबातील, समाजातील आपले आप्तस्वकीय, हितचिंतक यांचे स्थान हिराबाई अधोरेखित करतात. जयद्रथाच्या कचाट्यातून मुक्त झाल्यावर द्रौपदीला झालेला आनंद त्याचबरोबर जयद्रथाच्या दुष्कृत्याचा अनावर संताप महत्त्वाचा आहे. स्त्रीकडे संकुचित आणि दूषित नजरेने पाहणाऱ्या विचारसरणीला दिलेली ती सणसणीत चपराक आहे. अंतिमत: द्रौपदीच्या होणाऱ्या विजयाचा घटनेच्या माध्यमातून सत्याचा, न्यायाचा विजय हे मुद्दे अधोरेखित करतानाच स्त्रीचे सबळीकरण, सक्षमीकरण या आवश्यकतेकडे देखील हिराबाई लक्ष वेधून घेतात. तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा आणि समाजातील स्त्रियांच्या एकूण स्थानाचा विचार करता हिराबाईंनी केलेला हा धाडसी विद्रोहच म्हणावा लागेल.

प्रस्तुत नाटकाची भाषाशैली तत्कालीन परिस्थितीला साजेशी आहे. किर्लोस्कर, खाडिलकर, देवल यांच्यासारख्या नाटककारांच्या भाषाशैलीशी जवळीक साधणारी भाषाशैली या नाटकात दिसून येते. जन्मापासून ज्या नाटकांचा आणि नाटककारांचा आदर्श, प्रेरणा हिराबाईंच्या डोळ्यांसमोर होती त्याच्याच परिणामस्वरूप अशा पद्धतीची भाषाशैली या नाटकात वापरली गेली आहे असे म्हणता येते. वेगवेगळ्या प्रकारच्या भाषालंकारांचा सुयोग्य वापर संवादांत केलेला दिसतो. एकंदर सर्वच पात्रांच्या तोंडी पांडित्यप्रचुर अशाच पद्धतीची भाषा दिसून येते. एखादी सर्वसामान्य गोष्ट देखील अतिशय अलंकारिक पद्धतीने सांगण्याचा प्रयत्न काही ठिकाणी दिसून येतो. त्यामुळे संवादातील अलंकारिकतेचा अर्थ लावताना कथानकाकडे काहीसे दुर्लक्ष होण्याचाही संभव आहे. परंतु, एकंदरीत कथानकाचा केंद्रबिंदू, पात्रे आणि

घटनाप्रसंग यांचा विचार करता अशा पद्धतीची भाषाशैली शोभून दिसते. तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव, लेखिकेची जडणघडण, शिक्षण, लाभलेले वातावरण, आसपासची संस्कृती, माणसे यांचा लेखिकेच्या जीवनावरील प्रभाव पाहिल्यास हिराबाईंच्या लेखनात अशी भाषा येणे स्वाभाविक म्हणावे लागेल.

प्रस्तुत नाटकात पारंपरिक संगीत नाटकांप्रमाणे विविध घटनाप्रसंगांच्या निमित्ताने अनेक नाट्यपदे येताना दिसतात. नटी, सूत्रधार, जयद्रथ आणि द्रौपदी या पात्रांच्या तोंडी बुहतांश पदे येताना दिसतात. त्याचबरोबर कुंदा, चंद्रिका, सुव्रता, अर्जुन, धर्मराज आणि भीम या पात्रांच्या तोंडी देखील पदे आहेत. या नाटकात कथानकाच्या तुलनेने पदांची संख्या प्रचंड आहे. जवळपास प्रत्येक महत्त्वाच्या वाक्या नंतर, संवादाला अनुसरून, प्रसंगानुरूप नाट्यपद आलेले दिसते. या पदांतून त्या पात्राची भावना, विचार मांडत असतानाच कथानकालाही पुढे नेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

प्रस्तुत नाटकाच्या सुरुवातीला नाटकाची स्वतंत्र नांदी आहे. नाटकात नांदी, नाट्यपदे आणि त्याचबरोबर साकी, दिंडी यासारख्या काव्यरचनाही आलेल्या आहेत. या सर्व पद्यरचना स्वत: लेखिकेने केल्या असून त्यातून लेखिकेच्या गद्य तसेच पद्य रचनेच्या हातोटीचा अंदाज येतो. गीतांना दिलेल्या चाली समर्पक असून, घटनाप्रसंगाला अनुरूप राग, ताल, शैली यांची निवड केल्यामुळे ही नाट्यपदे अधिक समर्पक आणि प्रभावी ठरली आहेत. पारंपरिक संगीत नाटकांतील पदांच्या धर्तीवर याही नाट्यपदांची संगीतरचना केली असल्यामुळे पारंपरिक संगीत नाटकांच्या परंपरेशी हे नाटक आणि त्यातील पदे थेट संबंध दर्शवितात.

'संगीत जयद्रथ विडंबन' हे हिराबाई पेडणेकर लिखित नाटक १९०३ साली लिहिले गेले आणि १९०४ साली ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. परंतु त्याचा पहिला रंगमंचीय प्रयोग व्हायला मात्र २०२० साल उजाडावे लागले. प्रकाशन झाल्याच्या तब्बल ११६ वर्षांनंतर रंगमंचावर पहिल्यांदा सादर होणे हाच मुळात संगीत रंगभूमी आणि नाट्यसृष्टीतील महत्त्वाचा विक्रम ठरावा. हिराबाईंचे एकंदर जीवन, त्यातील चढउतार, जीवनाचा खडतर प्रवास, समाजाकडून होणारी अप्रितिष्ठा, कलाक्षेत्राने दखल न घेणे यासारख्या

कारणांमुळे हे नाटक रंगमंचावर येण्यापासून दूर राहिले असावे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, आपले पहिलेच नाट्यलेखन आणि त्यातही 'स्वान्त सुखाय' या भूमिकेतून लिहिलेले असल्यामुळे तसेच आपल्या जीवनाची एक प्रकारे कहाणी वर्णन केली असल्याने त्याच्या प्रयोगाविषयी हिराबाई फारशा आग्रही राहिल्या नसाव्या. परंतु, या नाट्यलेखनाने त्यांना नाटककार आणि वैशिष्ट्यपूर्ण काव्यामुळे कवयित्रीचा दर्जा प्राप्त करून दिला एवढे मात्र निश्चित. नाटकाविषयीच्या मनोगतात आणि अर्पणपत्रिकेत हिराबाईंनी हे नाटक पांडवप्रताप ग्रंथाच्या प्रभावाने लिहिल्याचे म्हटले आहे. मराठी भाषेची सेवा या हेतूने आपण हे नाटक लिहीत आहोत. असेही हिराबाई नमूद करतात. अर्पणपत्रिकेत हिराबाईंनी हे नाटक आपल्या आईला, भीमाताई पेडणेकर यांना अर्पण केले आहे.

पारंपरिक संगीत नाटकांचे सर्व पैलू आणि घटक समाविष्ट केल्याने या नाटकाला स्वतंत्र आणि विशिष्ट दर्जा निश्चित प्राप्त होतो. नांदीने होणारी मंगल सुरुवात, वैशिष्ट्यपूर्ण नाट्यपदे आणि समारोपात ईशस्तुती यासारख्या गुणांमुळे हे नाटक संगीत नाटकांच्या पंक्तीत समर्थपणे बसते. नाटक हे केवळ समाजाच्या मनोरंजनाचे नव्हे तर जनजागृती आणि प्रबोधनाचेही माध्यम असते. या अर्थाने विचार करता प्रस्तुत नाटकाच्या माध्यमातून स्त्रीविषयक जाणिवा समृद्ध करण्याचा, स्त्रीच्या वेदनांकडे लक्ष वेधण्याचा आणि त्याविषयी समाजाला अधिक संवेदनशील बनवण्याचा प्रयत्न लक्षणीय आहे. सत्याचा असत्यावर आणि न्यायाचा अन्यायावर होणारा विजय या गुणांचे दर्शन घडवून जीवनविषयक आशावादी दृष्टी लेखिकेने अधिरेखित केली आहे. समाजात स्त्रीची होणारी परवड या ज्वलंत प्रश्नाशी स्वतःच्या जीवनातील घटनाप्रसंगांचे संदर्भ जोडून लक्ष्यार्थाने द्रौपदीच्या माध्यमातून हिराबाई पेडणेकरांनी मांडलेली ही करुणरसपूर्ण अशी स्वजीवनाची कहाणी म्हणावी लागेल.

**संगीत जयद्रथ विडंबन**

प्रथम प्रयोग : गुरुवार, २४ डिसेंबर २०२०

स्थळ : राजीव गांधी कला मंदिर, फोंडा-गोवा.

वेळ : सायंकाळी ७ वाजता

**संगीत जयद्रथ विडंबन नाटकाच्या पहिल्या वहिल्या प्रयोगातील कलाकार आणि तंत्रज्ञ :**

**लेखन : हिराबाई पेडणेकर (प्रकाशन : १९०४)**

दिग्दर्शन : विजयकुमार नाईक

संगीत दिग्दर्शन : अजय नाईक

संगीत साथ : समीर परब (ऑर्गन), रुद्राक्ष वझे (तबला)

प्रकाश योजना : मार्क फर्नांडिस

नेपथ्य : अजय फोंडेकर

रंगभूषा : चारुदत्त फडते

वेषभूषा : आदर्श गोवेकर

**कलाकार :**

सूत्रधार / धौम्य : केदार मिस्त्री

नटी / धात्रेयिका : दिव्या गावस

जयद्रथ : शिवराज मळीक

कोटीक : पुरुषोत्तम म्हार्दोळकर

द्रौपदी : तस्लिमा मयेकर

अर्जुन : आदर्श गोवेकर

धर्म : धीरज नाईक

भीम : रोहित सतरकर

दवंडी : अनिकेत नाईक

**निर्मिती :** विजयकुमार्स ट्रॅव्हलिंग बॉक्स थिएटर, फोंडा-गोवा

**– प्रा. चिन्मय मधू घैसास**

मराठी विभाग, गोवा विद्यापीठ, गोवा


भ्रमणध्वनी– ९८२३७२८६४०

□□□

ISSN 2456-656X

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

जानेवारी ते मार्च २०२२



महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

अंक क्र. ३७७, जानेवारी ते मार्च २०२२

संपादक । **डॉ. पुरुषोत्तम काळे**

प्रकाशक । **प्रकाशक पायगुडे** प्रमुख कार्यवाह

**महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे**

४९६ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे ४११०३०.

दूरभाष । ०२०–२४४७५९६३

संकेतस्थळ । www.masapapune.org

ई–मेल । masaparishad@gmail.com

कार्यालयाची वेळ ।

सकाळी ९.०० दुपारी १२.००

दुपारी ४.३० ते रात्री ८.००

# मसाप पत्रिका
# जानेवारी ते मार्च २०२२
# अंक ३७७

संपादक
**डॉ. पुरुषोत्तम काळे**

मुद्रक–प्रकाशक
**प्रकाश पायगुडे**
प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०

संपादकीय संयोजन
**संदीप खाडे**

अक्षरजुळणी व सजावट
**लक कलाकल्य**

मुखपृष्ठ
**जयदीप कडू**

मुद्रितशोधन
**आरती देवगांवकर**

मुद्रणस्थळ
**एस. ए. प्रिंटर्स, एल. एल. पी.**
फ्लॅट नं. ५, ३ रा मजला,
सिद्धीविनायक अपा.,
शिवदर्शन, पुणे ४११००९

मूल्य : **१५ रुपये**



या अंकात व्यक्त झालेल्या विचारांशी संपादक, संपादन समिती, सल्लागार मंडळ तसेच प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग

## मसाप पत्रिका । जानेवारी ते मार्च २०२२

१) एका पर्वाची अखेरः मा. कौतिकराव ठाले पाटलांची साहित्य संस्थात्मक कार्यातून निवृत्ती । **डॉ. पुरुषोत्तम काळे** । ६
२) एनडी नावाचा झंझावात । **विजय चोरमारे** । ९
३) अनिल अवचट : चिरवंचित वर्गाचा लेखक आणि तरुणाईचा सहोदर। **अरुण खोरे** । १३
४) घेतला वसा । **माधव वझे** । १९
५) वाङ्मयाचा अभ्यास हेच समीक्षाशास्त्राचे मूळ रूप आहे । **सुधीर रसाळ** । २३
६) जॉन स्टाइनबेक-ऑफ माइस अँड मेन आणि द ग्रेप्स ऑफ राथ : दशा स्थलांतरितांची । **शिरीष चिंधडे** । २७
७) स्थळपुराणांच्या अभ्यासाच्या दिशा । **डॉ. सदाशिव पाटील** । ३५
८) कादंबरी आकलनाचे व्यूह आणि कथात्म साहित्य । **डॉ. गजानन भोसले** । ३९
९) ग्रामीण साहित्यप्रवाहातील मैलाचा दगड-पाचोळा : एक लघुकादंबरी । **प्रा. डॉ. संजय नगरकर** । ४७
१०)वास्तव दर्शन घडवणारी अशोक पवार यांची 'भुईभेद' कादंबरी । **भास्कर गायकवाड** । ५३
११) शांततेचा खोलस्वर- कमबख्त निंदर । **अंजली आंबेकर** । ५७
१२) मी सावित्री जोतीराव : चरित्रात्मक कादंबरी एक मानदंड । **डॉ. दादा गोरे** । ६०
१३) अस्तित्व शोधाचा प्रवास- सरोवर । **प्रा. विद्या सुर्वे बोरसे** । ६९
१४) बा. द. सातोस्कर यांच्या कथालेखनातील स्त्री व्यक्तिरेखाटन । **शुभांगी अनंत आसोलकर** । ७२
१५) 'अगा कवितांनो'- कवितेच्या बहुविध वैशिष्ट्यांचा साक्षेपी वेध । **सुनिता टिल्लू** । ७७
१६) मुलांच्या कल्पनाविश्वाचा खजिना : बाल कवितासंग्रह 'माझे गाणे आनंदाचे' । **प्रा. डॉ. रंजना कदम** । ८३
१७) वेणा : स्त्रीजाणिवांचा एक विस्तृत पट । **कीर्ती शशिकांत जाधव** । ८६
१८) सामाजिक हतबलतेतून जगण्याचे भान देणारी 'अविनाशपासष्टी' । **दीपक करंदीकर** । ९३
१९) स्वप्नाकडून वास्तवतेकडे घेऊन जाणारं काव्य...! 'संविधानाच्या स्वप्नातलं गाव' । **वर्षा मारुती भिसे** । ९६
२०) शेती, माती आणि शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी धडपडणाऱ्या 'भूमिनिष्ठांची मांदियाळी' । **शरद ठाकर** । ९९
२१) सत्यशोधक चळवळीचा दस्तऐवज : सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील (जीवनकार्य आणि लेखनसमीक्षा) । **प्रा. डॉ. नाना झगडे**। १०३
२२) पालशेतची विहीर : स्त्री वेदनेचा हुंकार । **प्रा.चिन्मय घैसास** । १०७
२३) वाचक प्रसारमाध्यमे व साहित्यव्यवहार । **डॉ. देविदास मल्हारी शेटे** । १११
२४) महाराष्ट्रातील आदिवासी चळवळ । **प्रा. डॉ. राहुल गोंगे** । ११५
२५) मुस्लिम मराठी साहित्य : एक दृष्टिक्षेप । **शेख शफी बोल्डेकर** । १२१
२६) पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये मिळून साऱ्याजणी मासिकाचे स्थान । **पवार मंदाबाई सोपान** । १२६
२७) कार्यवृत्त । १३२

# पालशेतची विहीर : स्त्री वेदनेचा हुंकार

**आद्य महिला नाटककार हिराबाई पेडणेकर यांच्या जीवनावर आधारित 'पालशेतची विहीर' या विजय नाईक लिखित नाटकावरील परीक्षण लेख**

**प्रा. चिन्मय मधू घैसास**

**प्रस्तावना**

आद्य महिला नाटककार असा ज्यांचा उल्लेख केला जातो त्या म्हणजे हिराबाई पेडणेकर. कोकणातील सावंतवाडीत २२ नोव्हेंबर १९८६ रोजी जन्मलेल्या हिराबाईंचा जीवनप्रवास कोकणातच, रत्नागिरीतील पालशेत गावी १८ ऑक्टोबर १९५१ या दिवशी थांबला. बालपणापासून मुंबईतील गिरगावात बालपण घालवलेल्या हिराबाईंनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीच्या विरुद्ध जात शिक्षण घेतले. स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी शिक्षण हाच उत्तम मार्ग असू शकतो यावर त्यांचा दृढ विश्वास होता. स्वत:च्या कार्यकर्तृत्वाने त्यांनी ही गोष्ट सिद्धही करून दाखवली. घराण्यातच असलेल्या नृत्य, संगीत या कलांचा उत्तम परिचय त्यांना होता. त्याचप्रमाणे साहित्याचीही जाण फार चांगल्या पद्धतीने विकसित झाली होती.

नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांच्या प्रेरणेने त्यांना मराठी नाटकाची गोडी लागली. नंतरच्या काळात अनेक नामवंत साहित्यिक, नाटककार आणि संगीतकारांशी त्यांचा परिचय झाला आणि त्यातून त्यांची प्रतिभा विकसित झाली. या मंडळींकडून स्फूर्ती घेत हिराबाई स्वत: नाटककार झाल्या. हिराबाईंनी १९०५ साली 'जयद्रथ विडंबन' हे पहिले (संगीत) नाटक लिहिले. प्रकाशनाच्या तब्बल ११६ वर्षांनंतर २०२० साली गोव्यातील फोंडा येथे राजीव गांधी कला मंदिरात दिग्दर्शक विजयकुमार नाईक आणि त्यांची संस्था व्हीटीबीटी (विजयकुमार्स ट्रॅव्हलिंग बॉक्स थिएटर, फोंडा) यांनी या नाटकाचा पहिलावहिला प्रयोग सादर केला. 'संगीत दामिनी' हे त्यांचे नाटक १९०८ साली रंगभूमीवर सादर झाले आणि १९१२ साली ते पुस्तकरूपाने प्रकाशित झाले. हिराबाई पेडणेकर यांनी नाटकासोबतच कविता आणि इतर लेखनही केले. तत्कालीन अव्वल दर्जाच्या नियतकालिकांत त्यांचे लेखन प्रसिद्ध होई. त्यांनी लिहिलेल्या मीराबाईच्या आणि कवी जयदेवाची पत्नी यांच्यावरच्या दोन्ही नाटकांना फारशी प्रसिद्धी मिळाली नाही. हिराबाईंनी श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या 'प्रेमशोधन' (१९१०) आणि राम गणेश गडकरी यांच्या 'पुण्यप्रभाव' (१९१६) या नाटकांना संगीत दिल्याचाही दाखला सापडतो.

हिराबाई पेडणेकरांच्या जीवनावर वसंत कानेटकरांनी 'कस्तुरीमृग' हे नाटक लिहिले होते. अलीकडेच 'आद्य महिला नाटककार हिराबाई पेडणेकर' या नावाने शिल्पा सुर्वे यांनी हिराबाई पेडणेकर यांचे चरित्र प्रकाशित केले

आहे. हिराबाई पेडणेकर यांच्या जीवनाचे चित्रण करत त्या माध्यमातून तत्कालीन समाज आणि कालखंड यांचे दर्शन 'पालशेतची विहीर' या विजयकुमार नाईक (गोवा) लिखित नाटकातून घडते. प्रस्तुत नाटकाचा आणि त्याद्वारे हिराबाई तसेच तत्कालीन स्त्री वेदनेचा हुंकार यांचा वेध घेण्याचा हा प्रयत्न.

**कथानक**

सदर नाटकाचे कथानक हिराबाई पेडणेकर यांच्या जीवनावर बेतलेले आहे. त्यांचा जन्म कलावंत समाजात झाला. आईवडिलांचे छत्र हरपल्यामुळे त्यांचे पालनपोषण त्यांची मावशी करते. त्यांची मावशी स्वत:प्रमाणे लहानग्या हिराला देखील शरीरविक्रयासाठी प्रवृत्त करते. हिराची मावशी हिराचा सौदा पाध्ये या गृहस्थाशी करते. औपचारिक शिक्षणाचा परिचय झाल्यामुळे हिराच्या विचारांना प्रगल्भतेचे कोंदण लाभलेले असते त्यामुळे ती मावशीच्या या प्रस्तावाला कडकडून विरोध करते. यावर मावशी तिला समजावण्याचा प्रयत्न करते. आयुष्याची आर्थिक बाजू सांभाळण्यासाठी ही वाट धरणे आपल्याला भाग आहे हा मुद्दा मावशी तिला समजावण्याचा प्रयत्न करते. दुसरीकडे, कला सादरीकरण करून तसेच नाटके लिहून, सादर करून आपण आपला उदरनिर्वाह करू असा निर्धार हिरा व्यक्त करते; परंतु, आपली जात यात आडवी येईल ही धोक्याची सूचना मावशी तिला देते. मावशीने सांगितल्याप्रमाणेच पुढे अनेक गोष्टी हिराच्या आयुष्यात घडत जातात.

हिराबाईंच्या आयुष्यात अनेक पुरुष येतात आणि जातात; परंतु तिचा पूर्णपणे स्वीकार करण्यास बहुतेक जण नकार देतात. त्यामागे, या पुरुषांच्या मनातील सामाजिक विटाळाची भीती, प्रतिष्ठेची चिंता हे मुद्दे प्रामुख्याने दिसून येतात. हिराच्या कलेचा फायदा आपल्या स्वार्थासाठी बहुतेक पुरुष करून घेतात. त्यांच्यापैकी काही जण तिला, उघडपणे नव्हे तर लपत-छपत, स्वीकारण्याची तयारी दर्शवितात; परंतु, हिराला मात्र हवा असतो तो आयुष्यभराचा जोडीदार, कायमची साथ. अशी साथ न मिळाल्याने हिराचा भ्रमनिरास होतो आणि हळूहळू ती मद्याचा, व्यसनाचा आधार घेऊ लागते. व्यसनाधीनतेमुळे तिची साहित्य/कला प्रतिभा देखील ढासळू लागते.

अशातच कृष्णाजी नारायण नेने या सद्गृहस्थाची मदत, त्यांचा आधाराचा हात हिराबाईंना लाभतो आणि ते तिला रत्नागिरीतील पालशेत या गावी घेऊन येतात. अट मात्र एकच असते की, पुन्हा नाटक वा कलेकडे फिरकायचे नाही. ही अट मान्य करून हिराबाई पालशेतला येतात आणि अखेरच्या श्वासापर्यंत आपले उर्वरित आयुष्य तिथेच घालवतात. याच पालशेत गावात श्री. नेने यांच्याच मदतीने उभारलेल्या त्या विहिरीशी आपले मन मोकळे करत हिराबाईंनी केलेल्या संवादाच्या रूपात नाटक सुरू होते आणि उत्तरोत्तर कथानक उलगडत जाते. एकूणच, पालशेतमधील विहिरीशी संवाद करत असलेल्या हिराबाईंच्या माध्यमातून त्यांचे पूर्वायुष्य आणि त्याचबरोबर तत्कालीन समाज, परिस्थिती, कालखंड यांचे दर्शन या नाटकात घडते.

**भाषाशैली / संवाद**

प्रस्तुत नाटकाची भाषाशैली साधी, सोपी, सरळ आहे. १९ व्या शतकाचे अखेरचे दशक ते २० व्या शतकाचा पूर्वार्ध असा कालखंड या नाटकात दिसून येतो. त्या दृष्टीने तत्कालीन भाषा, बोलण्याचा लहेजा, शैली पात्रांच्या संवादांत आहे. नाटकातील पात्रांचे वय, त्यांची पार्श्वभूमी, त्यांचा शैक्षणिक/ सांस्कृतिक/ सामाजिक/आर्थिक स्तर या घटकांबरहुकूम पात्रांची भाषा आलेली आहे. पात्रांचे संवाद प्रमाण भाषेतील आहेत. त्या-त्या पात्राच्या तोंडचे संवाद ऐकताना त्या पात्राची चौकट स्पष्टपणे लक्षात येते. हिरा आणि विहीर यांच्या संवादाच्या माध्यमातून नाटक सुरू होते आणि पुढे विविध पात्रांच्या मदतीने कथानक पुढे जाते. अनेक ठिकाणी हिराबाईंचा स्वत:शी संवाद होताना दिसतो. हिराबाई, भीमा (मावशी), नेने, पाध्ये, फादर, नानासाहेब, तात्यासाहेब, चिंतोबा, देवलमामा (गोविंद बल्लाळ देवल), गुर्जर, केशवराव, मंदार, विश्वानंद, सदानंद ही पात्रे या नाटकात आहेत. या पात्रांची भाषा सयुक्तिक आहे. पात्रांच्या तोंडी असणारी भाषा काहीवेळा अलंकारयुक्त दिसून येते; परंतु ती समजण्यास कठीण जात नाही. भाषेचा ढंग तत्कालीन परिस्थिती आणि कालखंड डोळ्यांसमोर उभा राहण्यास उपयुक्त असा साजेसा आहे.

**सादरीकरण**

प्रस्तुत नाटकाचे प्रयोग विविध संस्था आणि

व्यक्तींनी केलेले आहेत. वेगवेगळ्या प्रयोगांच्या सादरीकरणातून त्यातील प्रायोगिकता दिसून येते. रुद्रेश्वर, पणजी आणि व्हीटीबीटी (विजयकुमार्स ट्रॅव्हलिंग बॉक्स थिएटर, फोंडा) या संस्थांनी या नाटकाचे प्रयोग केलेले आहेत. रुद्रेश्वर, पणजी निर्मित नाटकात, प्रौढ आणि तरुण अशा दोन अवस्थांतील हिरा दर्शविण्यासाठी दोन स्त्री कलाकार वापरण्यात आलेले आहेत. मात्र, व्हीटीबीटी, फोंडा निर्मित नाटकात हिराची भूमिका चार विविध महिला कलाकार साकारतात. या चार कलाकारांच्या माध्यमातून हिराच्या मनातील घालमेल, विचार, भावना, वैचारिक आणि मानसिक कल्लोळ दर्शवण्यात आलेला आहे. नेपथ्य, प्रकाशयोजना, पार्श्वसंगीत, वाद्ये यांचा वापर समर्पकपणे केला गेला आहे. मंचावर सादर होणारी गीते, पदे कधी ध्वनीमुद्रित, तर कधी प्रत्यक्ष गायनाच्या माध्यमातून रसिकांसमोर प्रस्तुत होतात. नेपथ्याचा वापर कमीतकमी करून सूचकपणे कथानक दाखवण्याचा प्रयत्न केला गेला आहे. एकूण नेपथ्यात मंचाच्या मध्यभागी असणारी विहीर अतिशय महत्त्वाची ठरते. हिराबाईचा विहिरीशी झालेला संवाद हा कथानक आणि नाटकाचा प्राण असल्याने विहिरीचे स्थान केंद्रवर्ती ठरते. इतर प्रसंग आणि स्थळे बहुतांशी सूचकपणे दर्शविण्यात आली आहेत.

**संगीत**

पालशेतची विहीर हे नाटक संगीत नाटक म्हणून जरी प्रदर्शित करण्यात आले नसले तरी त्यात संगीताचा झालेला प्रचंड वापर पाहता त्याला संगीत नाटक म्हणणे महत्त्वाचे ठरेल. एकूणच नाटकाचे कथानक संगीत नाटकाच्या क्षेत्रातील व्यक्तीच्या जीवनावर आधारित आहे आणि कथानकात अनेक ठिकाणी पारंपरिक संगीत नाटकाच्या धर्तीवर नाट्यपदे आणि गीते येतात. या गीतांच्या आणि पदांच्या चालीसुद्धा संगीत नाटकाच्या चौकटीत बसणाऱ्याच आहेत. ही पदे, गीते मंचावरील पात्रे स्वत: सादर करतात आणि ती कथानकाला पूरक आहेत.

**सामाजिक चित्रण आणि स्त्री जाणिवा**

पालशेतची विहीर या नाटकाचा एकूण गाभा हिराबाई पेडणेकर यांच्या जीवनातील दु:ख, वेदना, कारुण्य यांचे दर्शन घडवणारा आरसा आहे. समाजाकडून झालेल्या उपेक्षेमुळे एक हरहुन्नरी कलाकार कसा वेदनादायी नामशेष झाला याचे ज्वलंत चित्रण या नाटकात पाहावयास मिळते. हे नाटक म्हणजे हिराबाई पेडणेकर यांची केवळ जीवनकहाणी नाही. या नाटकातून तत्कालीन समाज, परिस्थिती देखील स्पष्टपणे दिसून येते. तत्कालीन समाजाचे जीवन, सामाजिक भेदांत अडकलेल्या समाजाच्या मनातील स्वार्थी विचार, स्त्री म्हणजे भोगाची वस्तू असा विचार करण्याची वृत्ती, त्यातून हिराबाईंना झालेल्या यातना आणि त्यांची दुर्दैवी पडझड यांचे भयाण चित्रण या नाटकात दिसते. कवी मनाच्या हिराबाईंना केवळ लेखनच नव्हे तर काव्य, संगीत, अभिनय अशा सर्वच स्तरांवर प्रावीण्य प्राप्त झालेले होते; परंतु एका विशिष्ट कुळात/समाजात जन्माला आल्यामुळे त्यांना समाजाकडून अवहेलना सहन करावी लागली. माणसाजवळ कितीही कौशल्य वा योग्यता असली तरी त्याची पारख ही फार मोठ्या प्रमाणात त्याच्या जातीवरून केली जाते हे समाजवास्तव या नाटकातून दिसून येते.

हिराबाईंना आयुष्यात झालेले दु:ख आणि वेदना जशा या नाटकात येतात तसेच त्यांच्या जीवनातील आनंदाचे, सुखाचे क्षणही दाखवण्यात आले आहेत. शिक्षण मिळाल्याचा आनंद, कुणीतरी आपल्याला स्वीकारण्याची तयारी दाखवल्याचा आनंद, आपल्या कलेचे चीज होईल या आशेचा आनंद अशा विविध अवस्था दिसतात; परंतु प्रत्येक प्रसंगी आनंदाचे हे सर्व क्षण औट घटकेचे ठरतात आणि दर वेळी निराशाच त्यांच्या पदरी पडते. एक स्त्री, त्यात कलावंत समाजात जन्माला आलेली या दृष्टीनेच तिच्याकडे प्रत्येक वेळी पाहिले जाते. तिच्या प्रत्येक गुणाचा आपल्या स्वार्थासाठी वापर करून घेणारी माणसे तिच्या आयुष्यात येतात आणि त्यातून हिराबाईंची फक्त पिळवणूकच होते. आपली जात प्रत्येक वेळी आडवी येणे याचबरोबर जवळपास प्रत्येकच पुरुषाच्या डोळ्यांतून आपल्याबद्दल दिसून येणारी पुरुषी, लालसी, वासनामय नजर तिला किळसवाणी वाटते. हेच अनुभव तिच्या मावशीचेही असतात; परंतु, मावशी या सर्वाला विद्रोह न करता मुकाट्याने सर्व काही सहन करते. शिक्षणाच्या अभावामुळे वा धीर न झाल्यामुळे ती कदाचित तसे वागत नसावी; परंतु हिरा मात्र बंड करते. यावरून स्त्री जीवनात शिक्षणाचे असणारे महत्त्व अधोरेखित होते.

कलागुणांची पारख करणाऱ्याबरोबर आपण जावे, आपल्या जीवनाची योग्य दिशा आपण ठरवावी, योग्य-अयोग्य यांच्याविषयी ठामपणे मत व्यक्त करण्याचा धीटपणा हिरा दाखवते त्यावरून तत्कालीन शिक्षित स्त्रीचा कणखरपणा दिसतो. आपली कला, रचना, संगीत चोरणाऱ्याला सज्जड शब्दांत दम देण्याची हिंमत जेव्हा हिरा करते तेव्हा तिचे गुन्हेगार तिच्या नजरेला नजर देऊन बोलूही शकत नाहीत यावरून तिचा अधिकार दिसतो; परंतु हे सर्व त्या एका माडीच्या चौकटीतच बंदिस्त उरते आणि कधीही सार्वजनिक होत नाही त्यामुळे हिरा कायम अज्ञातच उरते. स्त्री जीवनाची ही व्यथा हिराबाईंच्या माध्यमातून प्रतीकात्मक रूपाने दिसते.

समाजात, सर्वार्थाने उपेक्षित राहिलेल्या एका स्त्रीच्या मनातील खदखद, द्वंद्व यांचे दर्शन या नाटकात दिसते. हिराबाईंच्या जीवनाची व्यथा, दाहकता, मनाचे खचलेपण, हतबलता यांच्या माध्यमातून तत्कालीन स्त्रीचे आयुष्य पाहता येते. संगीत दामिनी मंचित न झाल्याचे दु:ख हिराबाईंना अधिक प्रमाणात झालेले दिसते; परंतु त्या मानाने जयद्रथ विडंबन नाटक मंचित न झाल्याचे दु:ख दिसत नाही. हिराबाईंच्या वाटचालीला हातभार लावणारी माणसे येतात त्यावरून तत्कालीन समाजातील सुष्ट घटकांचाही परिचय होतो. अनेक नाटककार लोकांना मिळालेला त्यांचा मदतीचा हात यावरून त्यांची योग्यता समोर येते. या सर्वांबरोबरच त्यांच्या जीवनातील विद्रोह आणि बंड तेवढेच दाहक आहे. स्वत:च्या अस्तित्वाचा शोध, स्वत्वाची जाणीव आणि प्रत्येक वाईट अनुभवाअंती एक नवी सुरुवात करण्याची केविलवाणी धडपड आणि अखेरीस परिस्थिती समोर लोटांगण असे हिराबाईंच्या जीवनाचे विविध पैलू दिसतात.

सामाजिक बहिष्काराच्या वा डागाळले जाण्याच्या भीतीने हिराबाईंनी देऊ केलेली अर्पणपत्रिकाही जेव्हा तिच्या आजूबाजूची माणसे नाकारतात तेव्हा तिला आपल्याबद्दलच्या लोकांच्या वास्तविक दृष्टीचा साक्षात्कार होतो. स्त्री जीवनाचे वर्णन करताना फक्त एखाद्या विशिष्ट जातीतीलच नव्हे तर सर्वच जातींतून स्त्रीचे आयुष्य कसे कुंठित करून ठेवण्यात आलेले आहे हेही हिराबाई या नाटकातून सांगताना दिसतात. अशा वेळी आपणच एकटे काही अभागी नाही असा स्वत:ला दिलासा देण्याचा, आपले दु:ख हलके करण्याचा, विसरण्याचा प्रयत्न हिराबाई करतात. यावरून एखादी स्त्री आपल्या जीवनातील कोणत्याही दु:खाकडे कशा नजरेने पाहते आणि स्वत:च स्वत:ची समजूत घालून त्यावर फुंकर घालते हे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

## समारोप

स्वत: प्रतिभावंत नाटककार, कवी, संगीतकार असणाऱ्या हिराबाई पेडणेकर अनेक नाटककार, संगीतकारांसाठी आदर्श ठरल्या. एखाद्या व्यक्तीच्या जीवनाचे दर्शन घडवणारे चरित्र वा चित्रपट असतो त्याप्रमाणे हिराबाईंच्या जीवनाचे दर्शन घडवणारे हे नाटक – (व्यक्तिचित्रणात्मक नाटक) म्हणावयास हरकत नाही. असुनी नाथ मी अनाथ असे जीवन जगलेल्या हिराबाई पेडणेकर यांच्या आयुष्याची ही दु:खद कहाणी तत्कालीन समाज आणि स्त्रीचे चित्रण करणारी आहे. मनात इच्छा असूनही हिराबाई यांना स्वीकारण्यास अनेकांनी दर्शवलेली असमर्थता वा नकार यांतून त्या काळातील समाजाचे दर्शन घडते. एखाद्या स्त्रीला तिच्या शरीरापलीकडे पाहणारी व्यक्ती भेटणे हे त्या स्त्रीसाठी किती हर्षदायक असू शकते याचा आदर्श वस्तुपाठ या नाटकात दिसतो. तथाकथित सामाजिक बंधने, प्रतिष्ठा यांचा पगडा तत्कालीन समाजजीवनावर किती होता हेही दर्शवण्यात आले आहे. एखाद्या स्त्रीच्या आयुष्याला सर्वार्थाने लाभलेले अपूर्णत्व, एकटेपणा, शारीरिक-मानसिक-वैचारिक-साहित्यिक शोषण किती भयाण असू शकते हे या नाटकात दिसते. एका स्त्रीद्वारे स्वत:च्या अस्तित्वाचा शोध घेणे, आयुष्याच्या भयाण संघर्षाचा सामना करणे आणि अखेरीस हतबलपणे स्वत:च्या अस्तित्वाच्या खुणा मिटवणे ही स्त्रीजीवनाची व्यथा या नाटकातून प्रदर्शित होते.

**संदर्भ :**


१. पालशेतची विहीर, लेखन : विजयकुमार नाईक
२. आद्य महिला नाटककार : हिराबाई पेडणेकर, शिल्पा सुर्वे, डिंपल पब्लिकेशन (मुंबई), प्रथमावृत्ती : ६ नोव्हेंबर २०१७



**प्रा. चिन्मय मधू घैसास**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, गोवा विद्यापीठ
संपर्क : ९८२३७२८६४०


पंचधारा
ग्रंथालय विशेषांक
वर्ष ६५ वे, अंक तिसरा व चौथा
ऑक्टोबर २०२२ ते मार्च २०२३
अश्विन ते फाल्गुन १९४४
अये चिरपरिश्रान्ता विद्या कान्तार चारिणः।
समागच्छत वस्तृप्तिं करोमि ज्ञानधारया ।।
संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय, सरस्वती भवन वाचनालय, वाराणसी
मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य, हैदराबाद
RNI Reg. No. 32307/79
मूल्य : २००/-

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
मराठी साहित्य परिषद, (तेलंगण राज्य) या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र

# पंचधारा

## ग्रंथालय विशेषांक


**वर्ष ६५ वे, अंक तिसरा व चौथा**
**ऑक्टोबर २०२२ ते मार्च २०२३**
**अश्विन ते फाल्गुन १९४४**



## संपादक मंडळ

**डॉ. विद्या देवधर (प्रमुख संपादक)**
**डॉ. शोभा देशमुख**
**डॉ. गीता काटे**
**प्रा. मीना जागीरदार**
**श्रीमती विद्या मक्तल**
**श्री. माधव रामराजे चौसाळकर**



## मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य

इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७
RNI Reg. No. 32307/79

**कार्यवाह**
म. सा. प. तेलंगण राज्य
४-६-४५८, इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७.
**भ्रमणध्वनी :** ७८४२८५३९८४
(संपर्क : सायंकाळी ५ ते ८) अन्यवेळी लिखित संदेश पाठवावे.

**प्रकाशक**
डॉ. विद्या देवधर

**सर्व हक्क** – म. सा. प. तेलंगण राज्य

या अंकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
फक्त एक व तीन वर्षाची वर्गणी स्वीकारली जाईल.
पंचधारेच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे.
सर्व सभासदांनी आपले E-mail ID फोन नंबर
पुढील क्रमांकावर पाठवावेत. ७८४२८५३९८४

पंचधारा वर्गणी Marathi Sahity Parishad
IDBI Bank, Kachiguda Branch
A/C. No. 59410010000125 किंवा Panchdhara
A/C. No. 59410010001359, IFSC Code – IBKL0000594
(For both accounts)
या खात्यावर जमा करावी. मनीऑर्डर पाठवू नये.

वार्षिक वर्गणी रु. २००/-
तीन वर्षाची वर्गणी रु. ५००/-
आजीव सदस्य वर्गणी रु. २,०००/-
(वर्गणी शक्यतो डी. डी. ने पाठवावी)
बाहेरगावचा चेक असल्यास वटणावळीचे रु. ३५/- अधिक पाठवावेत, ही विनंती

या अंकाचे मूल्य : रु. २००/-

टपाल खर्च : रु. ३५/-

अक्षरजुळणी व मुखपृष्ठ : अमोघ आर्ट्स, पुणे. फोन : ९३२६०८६२८५

मुद्रक : श्रीगणेश मुद्रणालय, ३५७, शनिवार पेठ, पुणे ३०.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखांशी, विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका

संपादकीय ........................................................................ ५

श्रद्धांजली! ........................................................................ ९
सिद्धहस्त लेखक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

**ग्रंथालय शास्त्र व ग्रंथपाल**

१. ग्रंथालयाचे अद्भुत विश्व ..................... डॉ. प्रतिभा अशोक गोखले .... १०
२. प्राचीन भारतातील ग्रंथालये .................. श्वेता काजळे .................... १७
३. पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन -
ग्रंथालय शास्त्राचे एक समर्पित शास्त्रज्ञ ........ डॉ. शोभा कुलकर्णी ............ २३
४. वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथालये -
ग्रंथालय क्षेत्रातील अनोखे दालन ........... सीमा कुलकर्णी ................. २७

**ग्रंथप्रेमी भारत**

५. मराठी ग्रंथ संग्रहालय - सांस्कृतिक ठेवा .... सतीश देशपांडे ................. ३१
६. ग्रंथालय चळवळीचे प्रवर्तक -
महाराजा सयाजीराव .......................... दिनेश पाटील ................... ३७
७. ज्ञानाचा खजिना - डॉ. मानसी जयंत केळकर
सरस्वती महल ग्रंथालय ........................ अनुवाद - विद्या मक्तल ......... ५२
८. गोमंत विद्या निकेतन ग्रंथालय -
११० वर्षांची समृद्ध वाटचाल ............... डॉ. सोमनाथ कोमरपंत ......... ५८
९. खुदा बक्ष ओरिएंटल
पब्लिक लायब्ररी, पटना ....................... सूर्यकांत कुळकर्णी ............. ६४
१०. मध्यवर्ती ग्रंथालय, बडोदे ..................... डॉ. वैभवी देहूकर .............. ६७
११. आंध्र तेलंगणातील सर्वात प्राचीन ग्रंथालय
श्री गौतमी ग्रंथालय (१८९८) राजमुंद्री ...... डॉ. नम्रता बागडे ............... ७१
१२. गोमंतकातील ग्रामीण नाट्यचळवळ प्रा. चिन्मय मधू घैसास
आणि नाट्यग्रंथालये ........................... डॉ. संजयकुमार करंदीकर ..... ८३
१३. वाङ्मय सरस्वतीचे अद्भुत ग्रंथागार
संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय बनारस
(वाराणसी) येथील
'सरस्वती भवन पुस्तकालय' ................. प्रा. डॉ. शाम बापट ............ ९१

१४. वाचन संस्कृती जपणारे -
सरस्वती मंदिर, पणजी ..................... चित्रा प्रकाश क्षीरसागर ........ ९६

## महाराष्ट्राचे ग्रंथवैभव

१५. एशियाटिक सोसायटी, मुंबई ................. डॉ. मीना वैशंपायन ........... १०१
१६. भारत इतिहास संशोधक मंडळातील
दुर्मीळ ग्रंथ, वृतपत्रे आणि कोश वाङ्मय ..... डॉ. अनुराधा कुलकर्णी ...... १०९
१७. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर .......... जयश्री बोकील .............. ११६
१८. शतकोत्तर हीरक महोत्सवाकडे वाटचाल
करणारे सार्वजनिक वाचनालय कल्याण ...... भिकू बारस्कर .............. १२२
१९. डेव्हिड ससून लायब्ररी आणि रीडिंग रूम -
वास्तू आणि बरेच काही ..................... कविता नवरे ................ १२५
२०. वल्लभदास वालजी जिल्हा वाचनालय -
जळगावचा सांस्कृतिक मानदंड ............. विजय पाठक ................ १२८
२१. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय :
शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष ................ उमा नाबर ..................... १३२
२२. महिला संचालित ग्रंथालये ..................... चित्रा जोशी .................. १३६
२३. मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे .................. चांगदेव काळे ................ १४१
२४. यथार्थ सरस्वती मंदिर - शेठ नारायण
बंकट वाचनालय, चाळीसगाव ............. रामदास कृष्णा कामत ....... १४७

## परदेशातील ग्रंथव्यवहार

२५. माझा मिस्सिस्सौगा वाचनालय सुनंदा म्हैसाळकर ............ १५०
प्रणालीचा प्रवास ............................ अनुवाद : अर्चना अचलेरकर
२६. पुस्तकं, माणसं व ग्रंथालयं .................. मल्लिका .................... १५३

## ग्रंथपरीक्षण

२७. आकांक्षांना पंख नभाचे ........................ बदीऊज्जमा बिराजदार ....... १५७
२८. आनंदयात्रेच्या प्रवासी ........................ अपर्णा नाडकर्णी ............ १६१

२९. स्वागत नव्या पुस्तकांचे ........................................................ १६५

३०. लेखक परिचय .................................................................... १६६

# संपादकीय

*"कराया मराठी भाषोन्नतीला, झटा सर्व या आदर्श सन्मतीला ।*
*करा भक्तीभावे तिची नित्य सेवा, सुखाचा तुम्हा ती अर्पिल मेवा ।"*

मराठी भाषेची उन्नती करतानाच, वाचकाला सन्मार्ग दाखवून आनंदही देणाऱ्या ग्रंथालयाचे महत्त्व न्या. केशवराव कोरटकर यांनी हैदराबाद येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या उद्घाटन समारंभात या काव्यपंक्तीतून सांगितले होते. लक्ष्मणराव फाटक यांच्या 'निजामविजय' नियतकालिकामध्ये ग्रंथालयाची आवश्यकता, वाचन आणि वाचनालयाचे महत्त्व, यासंबंधी आवर्जून चर्चा होत असे. विविध ठिकाणच्या ग्रंथालयांच्या कार्यक्रमांचे वृत्त हैदराबादवासी मराठी मंडळींपर्यंत पोहचविणारे, हैदराबादमध्ये भारत गुणवर्धक संस्थेचे ग्रंथालय असले तरी आणखी एक मध्यवर्ती ग्रंथालय हवे असा आग्रह संपादकांनी सातत्याने धरलेला दिसतो. ग्रंथालयासंबंधी 'सार्वजनिक ज्ञानसत्रे' असा अग्रलेख ६ सप्टेंबर १९२१ च्या अंकात आहे. मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या स्थापनेचे विस्तृत वृत्त 'निजामविजय' (३ व २४ ऑक्टोबर) मध्ये दिले होते. हैदराबादमधील मराठी ग्रंथ संग्रहालयाने २०२२च्या बलिप्रतिपदेच्या दिवशी आपल्या कार्याची शंभर वर्षे पूर्ण केली. शताब्दी वर्षाचा सांगता समारंभ २०२३च्या मार्चमध्ये होत आहे. या शताब्दी निमित्त हा 'ग्रंथालय विशेषांक' सिद्ध करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

ग्रंथालय आधिकाधिक लोकाभिमुख करणे आणि तेथील ग्रंथसंग्रह वाढवत राहाणे यामध्ये ग्रंथालयीन कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा असतो. लोकजागृती करून लोकशाहीचा पाया मजबूत करण्यात ग्रंथालये आणि ग्रंथालय चळवळीचेही योगदान आहे, असे जगभर मानले जाते. वीसाव्या शतकाच्या प्रारंभी बडोदे येथील श्री. एम. एन. अमीन यांनी शिक्षकीपेशा सांभाळून अनेक ग्रंथालये सुरू केली. बडोदा संस्थानाच्या सहायाने १९१० मध्ये बडोदा ग्रंथालयसंघाची स्थापना झाली. पुढे आंध्र, बंगाल येथे संघटना उभ्या राहिल्या. १८ व १९ जून १९२० रोजी पुणे येथील महाराष्ट्रीय मोफत वाचनालय परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाने महाराष्ट्रात ग्रंथालय चळवळीचा पाया घातला. महाराष्ट्रातील नव्वद ग्रंथालयांतील प्रतिनिधींच्या उपस्थितित महाराष्ट्रीय वाचनालय संघाची स्थापना झाली. वाचनालय परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान हैदराबाद येथील न्या. केशवराव कोरटकर यांनी

भूषविले होते. महाराष्ट्रातील परिवर्तनाचा वेध घेत हैदराबादमध्ये मराठी भाषा, संस्कृती, साहित्य व ग्रंथालय चळवळी आकाराला येत होत्या. मराठी कार्यकर्ते आणि समाजजीवन यांच्याकडून प्रेरणा घेऊन पहिले तेलुगु ग्रंथालय (१९०१) सुरू झाले. स्वातंत्र्यानंतर आलेला, आंध्रप्रदेशातील लोकप्रिय ग्रंथालय कायदाही एका मराठी माणसाच्या - शिक्षणमंत्री गोपाळराव एकबोटे यांच्या प्रयत्नामुळेच तयार झाला होता. एकबोटे यांनी १९५५ मध्ये ग्रंथालय विधेयकाचा मसुदा तयार करून सार्वजनिक वाचनालयाचे जनक श्री. रंगनाथन यांना दाखवला. त्यांच्याबरोबर चर्चा करण्यासाठी सार्वजनिक वाचनालयातील कार्यकर्त्यांबरोबर,. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन केले. १९५६ मध्ये हे विधेयक पारित झाले आणि कायदाही झाला. पुढे १९५६ मध्ये हैदराबाद राज्याचे विभाजन झाल्यानंतरही कर्नाटक व महाराष्ट्रात गेलेल्या जुन्या हैदराबाद राज्यातील गावातही हा कायदा चालू राहिला. संबंधित राज्यांनी त्याचे स्वागत केले. ग्रंथालयाची विविधता पाहताना डॉ. रंगनाथन यांचा परिचय करून तत्संबंधी लेख देणे आवश्यक आहे. डॉ. शोभा कुलकर्णी यांनी हा माहितीपूर्ण लेख लिहिला आहे. ग्रंथालये किंवा ग्रंथव्यवहार यामागे वाचन प्रेरणा हेच कारण असले तरी वाचनाचे विषय, उद्देश, वाचनालयासमोरील प्रश्न यामध्ये मात्र विविधता आढळते. पंचधाराच्या 'वाचनसंस्कृती आणि ग्रंथालय चळवळ' विशेषांकाला उत्तम प्रतिसाद मिळाला होता. विविध विषयांसंबंधी ग्रंथालये, तसेच मध्ययुगीन ग्रंथालयांपासून शतकमहोत्सवी ग्रंथालयांपर्यंत अनेक ग्रंथालयांची ओळख इथे आपल्याला होणार आहे. तसेच वाचक आणि ग्रंथपाल यांचे अनुभव आहेत.

ग्रंथालये म्हणजे सार्वजनिक वाचनालये आणि संदर्भ ग्रंथालये आहेतच पण त्याबरोबर अद्भुततेने नटलेले ग्रंथालयविश्व आपल्याला डॉ. प्रतिभा गोखले यांनी उलगडून दाखवले आहे. आपल्या संस्थेतील संशोधक, अभ्यासक व कर्मचारी यांना अद्ययावत माहिती पुरवणाऱ्या, त्यांच्यासाठी आवश्यक असेल, उपयुक्त ठरेल अशा माहितीचा शोध घेणाऱ्या विशेष ग्रंथालयाची ओळख सीमा कुलकर्णी यांनी करून दिली आहे. वेदकाळापासून समृद्ध ज्ञान परंपरा असलेल्या भारतात ग्रंथप्रेम आणि ग्रंथालये हा विशेष जिव्हाळ्याचा विषय होता. प्राचीन भारतातील सुप्रसिद्ध नालंदा विद्यापीठामध्ये हजारो बौद्ध भिक्षूंबरोबरच विद्यार्थी आणि अभ्यासक यांना उपयुक्त असा विपुल ग्रंथसंग्रह होता. नालंदाप्रमाणे तक्षशीला, वल्लभी, ओदंतपुरी, मिथिला, वाराणसी येथील विद्यापीठांतही ग्रंथसंग्रह होते. मध्ययुगीन विद्यापीठे आणि ग्रंथालये संबंधित लेखामधून आपल्यासाठी भव्य भारतीय परंपरेतील एक नवे पान उलगडीत

आहेत डॉ. श्वेता काजळे. राजाराम मोहन रॉय ग्रंथालयाचे या क्षेत्रात महत्त्वाचे स्थान आहे. तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयाची स्थापना १७व्या शतकात झाली तो इतिहास आपण डॉ. मानसी केळकर यांच्या लेखात वाचणार आहोत. भारतात आजही अस्तित्वात असलेले हे सर्वांत प्राचीन ग्रंथालय असून जगातील महत्त्वाच्या ग्रंथालयांत त्याचा समावेश आहे. पटना येथील खुदाबक्ष ग्रंथालयाचा परिचय कोलकाता येथील माजी ग्रंथपाल आणि बृहन्महाराष्ट्रातील मराठी उपक्रमांचे ज्येष्ठ पाठीराखे श्री. सूर्यकांत कुलकर्णी यांनी करून दिला. गोमंतकातील ग्रंथालयाची ओळख आपणास डॉ. सोमनाथ कोमरपंत, प्रा. चिन्मय मधू घैसास व चित्रा क्षीरसागर यांच्या लेखनातून होणार आहे. बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांनी ग्रंथालय व ग्रंथनिर्मिती आणि ग्रंथप्रसार यांचा घेतलेला ध्यास दिनेश पाटील यांच्या लेखातून वाचताना आपण स्तिमीत होतो. तर बडोदा येथील मध्यवर्ती ग्रंथालयाचा सविस्तर परिचय आपल्याला डॉ. वैभवी देहूकर यांनी करून दिला आहे. वाराणसी येथील संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालयाला प्रत्यक्ष भेट देण्याची उत्सुकता वाढवणारा डॉ. शाम बापट यांचा लेख आहे. आंध्र तेलंगणातील सर्वांत प्राचीन ग्रंथालयाचा परिचय डॉ. नम्रता बागडे यांनी करून दिला आहे. इंग्रजी राजवटीच्या प्रारंभापासून आपल्याकडे सार्वजनिक ग्रंथालयांच्या स्थापनेने वेग घेतलेला दिसतो. नेटीव्हांसाठी ग्रंथालये काढण्यास इंग्रजांनी प्रोत्साहन दिले असले तरी ग्रंथालय स्थापनेमागे भारतीयांचे अनेकविध उद्देश होते. समाजप्रबोधन ही मुख्य प्रेरणा त्यामागे होती, त्याबरोबर भारतीयांनी संघटित होणे, त्यांची अस्मिता जागी करणे व जोपासणे हेही ध्येय होते. मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करून टिकवणे ही मराठी ग्रंथसंग्रहालयामागे महत्त्वाची प्रेरणा होती. सर्वश्री वि.ल. भावे, विष्णु पटवर्धन, विनायक भावे यांनी मराठी ग्रंथांना अग्रस्थानी ठेवणारे मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे येथे स्थापन (१८९३)केले. कल्याण येथील सदाशिव मोरेश्वर साठे यांनी १८६४ मध्येच आपल्या घरात सार्वजनिक वाचनालय सुरू करून आपले ग्रंथभांडार जनतेसाठी उपलब्ध करून दिले. याबरोबर अनेक शतकमहोत्सवी ग्रंथालयांचा परिचय आपल्याला विविध समाजसेवी ग्रंथालय कार्यकर्ते आणि ग्रंथपाल यांनी करून दिला आहे. आपल्या घरात किंवा आपली पुस्तके देऊन अनेक ग्रंथालये सुरू झाली आणि ती परंपरा आजही चालू आहे. आदिलाबाद येथे सत्तरच्या दशकात चित्रा वझे यांनी ती सांभाळली; तर २०२२ मध्ये मराठी ग्रंथसंग्रहालयाची शाखा वैशाली व श्री. केळकर यांनी हायटेक सिटी भागात आपल्या घरातच सुरू केली आहे.

एशियाटिक सोसायटी, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, इतिहास संशोधन मंडळ अशा अनेक नामवंत संदर्भग्रंथालयांच्या कार्यांची,तेथील उपक्रमांची माहिती तेथील अभ्यासकांनी दिली आहे. अगदी वेगळ्या अशा डेव्हिड ससून लायब्ररीची माहिती तसेच महिला संचालित ग्रंथालयाची ओळखही येथे होईल. भारताप्रमाणे इजिप्त व रोमन सम्राज्यामधील ग्रंथप्रेमाचा इतिहासही रंजक आहे. आपण येथे अर्वाचीन अमेरिकेतील ग्रंथालयात मल्लिका यांनी मारलेला फेरफटका अनुभवणार आहोत. तसेच कॅनडामधील ग्रंथालयाची ओळख सुनंदा म्हैसाळकर यांनी करून दिली आहे.

नवनवीन ज्ञान संपादित करण्याची माणसाला सतत ओढ वाटत असते. त्यासाठी अधिक वाचन अपरिहार्य आहे. आता वाचनालयातून प्रत्यक्ष ग्रंथांची देवाणघेवाण करण्याची पद्धत बदलत आहे. तंत्रज्ञानाबरोबर ज्ञानसंपादनाची माध्यमे बदलली आहेत. हे लक्षात घेऊन आता पुस्तके रसिकांच्या व अभ्यासकांच्या भेटीला दृकश्राव्य माध्यमातून येत आहेत. ग्रंथालय प्रेम आणि 'पंचधारा' बद्दल आपुलकी यामुळे ज्येष्ठ, कार्यमग्न आणि सर्व विद्वान ग्रंथप्रेमींनी लिहिलेल्या लेखांमुळे हा दर्जेदार विशेषांक सिद्ध झाला आहे. लेखक व ग्रंथपरीक्षक यांचे मन:पूर्वक आभार मानते. साहाय्यक मंजरी ताम्हनकर व अमोघ आर्ट्स यांचेही मी आभार मानते. आजही ग्रंथालये ज्ञानधारेने क्षुधातृप्ती करीत आहेत. ही ज्ञानधारा अखंड बरसत राहणार आहे.

**– विद्या देवधर**
प्रमुख संपादक

**संदर्भ :**

ग्रंथ कल्याणी - प्रा. जितेंद्र सुरेश भामरे, प्रशांत वसंत मुल्हेकर
सार्वजनिक वाचनालय, कल्याण. ३ फेब्रुवारी २००८

**मुखपृष्ठ :** काशी येथील 'सरस्वती भवन पुस्तकालय'च्या प्रवेशद्वाराशी हे शिल्प आहे. त्याखाली श्लोक आहे
**अये चिरपरिश्रान्ता विद्या कान्तार चारिणः।**
**समागच्छत वस्तृप्तिं करोमि ज्ञानधारया ॥**
विश्वविद्यालयद्वारा ज्ञान पिपासुओंको आवाहन
'अहो विद्यारूपी नायिकेचा पाठलाग करणाऱ्यांनो
तुम्ही फार दमला आहा । स्वस्थचित्ताने या, मी ज्ञानधारेने तुमची तृप्ती करते.'

# गोमंतकातील ग्रामीण नाट्यचळवळ आणि नाट्यग्रंथालये





प्रा. चिन्मय मधू घैसास

प्रा. डॉ. संजयकुमार करंदीकर

**प्रस्तावना**

गोमंतक हा नाट्यवेडा, नाट्यप्रेमी, नाट्याभिमानी प्रदेश म्हणून सुपरिचित आहे. कृष्णंभट्ट बांदकरांपासून चालत आलेली गोमंतकातील नाट्यपरंपरा (विशेष करून संगीत नाट्यपरंपरा) थेट गोपाळकृष्ण भोबे यांच्यापर्यंत चालत आलेली आपल्याला दिसून येते. या नाट्यपरंपरेने आजवर अनेक नाट्यकलाकार, नट-नट्या, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, रंगभूषाकार, वेशभूषाकार आणि इतर सर्व प्रकारचे जाणकार घडवले आहेत. या परंपरेच्या माध्यमातून आजवर फक्त रंगमंचावरीलच नव्हे तर रंगमंचासमोरील सर्वसामान्य प्रेक्षक आणि सामान्य रसिक देखील घडला आहे. सर्वच प्रकारच्या लोकांची घडण या परंपरेतून झाली आहे. यासाठी प्रत्यक्ष नाट्यपरंपरेचा जेवढा प्रभाव कारणीभूत आहे तेवढेच त्याला पूरक इतरही घटक महत्त्वपूर्ण ठरले आहेत. यातील एक महत्त्वाचा घटक म्हणजे ग्रामीण पातळीवर चालत आलेली सहकारी तत्त्वावरील नाट्यग्रंथालये.

**स्वरूप**

जुन्या काळी ग्रामीण भागात कोणत्याही प्रकारच्या वाचनालयांची वा ग्रंथालयांची उपलब्धता फारशी नसे. त्यामुळे नाट्यवेड्या रसिकांच्या वाङ्मयीन आणि सांस्कृतिक गरजांची पूर्तता होणे कठीण होत असे. गोमंतकात जवळपास प्रत्येक गावात वार्षिक जत्रोत्सवाच्या निमित्ताने वा होळी, दसरा अशा मुख्य सणांच्या पार्श्वभूमीवर नाटके सादर करण्याची परंपरा आहे. ही नाटके आजही प्रामुख्याने संगीत नाटकेच असलेली दिसून येतात. अशा उत्सवांच्या वेळी सादर होणारी ही नाटके अनेकदा संख्येने एकापेक्षा अधिक देखील असतात. दर रात्री एक

नाटक अशा पद्धतीने काही दिवस वा आठवडाभर ही नाटके होतात. आज यासाठी नाटकांच्या संहिता सहजपणे उपलब्ध होत असल्या तरी जुन्या काळी, विशेषकरून गोवा मुक्तीपूर्व कालखंडात अशी सोय क्वचितच होत असे. त्यात नाटक बसवणे आणि ते सादर करणे यासाठी लिखित, छापील, प्रकाशित नाट्यसंहिता फारच महत्त्वाची ठरत असे. याच गरजेतून सुरुवात झाली ती म्हणजे गावागावातील हौशी नाट्यमंडळांच्या खाजगी, खासकरून नाटकांना वाहिलेल्या, सहकारी तत्त्वाच्या ग्रामीण पातळीवरील ग्रंथालयांची.

प्रारंभी अशा पद्धतीची ग्रंथालये गावातीलं एखाद्या महनीय व्यक्तीच्या पुढाकाराने सुरू झालेली पहावयास मिळतात. या ग्रंथालयांच्या निर्मिती आणि उभारणीमागे महत्त्वाचा हेतू आणि प्रेरणा म्हणजे गावात वार्षिक उत्सव आणि जत्रेच्या निमित्ताने नाटके सादर करणे हाच होता. ही ग्रंथालये ठरवून उभारली गेली होती असे म्हणता येईल का हा संशोधनाचा विषय ठरू शकेल. मात्र 'दरवर्षी नवीन नाटक सादर करणे' आणि 'दरवर्षी रसिकांना नवी नाट्यपर्वणी देणे' या हेतूने नवनवीन संहितांची भर या संकलानत होत जाई आणि त्यातूनच अशी ग्रंथालये आकाराला येत असत असेच दिसून येते. गोमंतकातील विविध गावातील जत्रा, उत्सवांच्या वेळी सादर होणारी नाटके ही प्रामुख्याने संगीत नाटके असल्याने अशा ग्रंथालयांत बहुतांश नाट्यसंहिता संगीत नाटकांच्याच असलेल्या पाहावयास मिळतात. आजवर लिहिल्या गेलेल्या आणि सादर झालेल्या परंतु काळाच्या ओघात विस्मृतीत गेलेल्या अनेक संगीत नाटकांच्या संहिता अशा जुन्या ग्रामीण ग्रंथालयांत पाहावयास मिळतात. या जुन्या नाट्य-इतिहासाचा आणि परंपरेचा वारसा या ग्रंथालयांच्या माध्यमातून आजही टिकवला गेला आहे हे विशेष.

**ग्रंथालयाचे कामकाज**

अशा प्रकारच्या ग्रंथालयांचे प्रशासन वा त्यांची हाताळणी ही पूर्णपणे गावातील हौशी नाट्यकर्मींच्या मदतीनेच होत असे. गावातील हौशी आणि अनुभवी नाट्यकर्मी, नाट्यरसिक आणि नाट्यक्षेत्राशी संबंधित व्यक्ती अशा ग्रंथालयांच्या कामात हातभार लावत. अशा ग्रंथालयांची एखादी अधिकृत समिती वगैरे स्थापन केली जात होती का? असा शोध घेतल्यास त्याचे उत्तर नाही असेच मिळते. सहकारी तत्त्वावर एकामेकांच्या मदतीने आणि सामंजस्याने या ग्रंथालयांचे कामकाज चालत असे. या ग्रंथालयांना कोणत्याही प्रकारचा आर्थिक आधार किंवा निधी कुठूनही मिळत नसे. परकी (पोर्तुगीज) राजवट असल्याने अशा तऱ्हेच्या

सांस्कृतिक कार्यक्रमांवर मुळातच आक्षेप असायचा. त्यातही नाटक सादर करायचे असलेच तर त्यासाठी रितसर परवानगी आणि काहीवेळा सेन्सॉर प्रमाणपत्र देखील मिळवावे लागे. नाटकाच्या माध्यमातून आपल्याविरुद्ध कोणत्याही प्रकारची रणनीती तर आखली जात नाही ना याची खातरजमा करण्यासाठी ही व्यवस्था असे. अशा परिस्थितीत नाटकांच्या संकलनासाठी वा ग्रंथालय निर्मितीसाठी आर्थिक मदत वा निधी मिळणे तर अशक्यप्राय गोष्ट होती.

अशा ग्रंथालयांसाठी गावातीलच माणसे आपल्या पैशातून त्याचा आर्थिक भार उचलत असत. आपली नाट्यहौस भागवण्यासाठी म्हणून हा सारा खटाटोप प्रामुख्याने केला जात असे. नाटक बसवण्यासाठी किमान एक-दोन महिने आगाऊ तयारी करावी लागे. त्यामुळे संहिता खरेदी करण्याची जबाबदारी गावातीलच हौशी मंडळींना करावी लागे. या कामी आर्थिक बाजू अनेकजण स्वेच्छेने उचलत असत. अशा व्यक्तीच्या नावाचा शिक्का या नाट्यसंहितांवर दिसून येतो. व्यक्तीशः त्यासाठी पैसे खर्च केलेले असले तरी हा सर्व खटाटोप आपणा सर्वांचा एकत्रित प्रयत्न आहे ही बंधुभावाची भूमिका मात्र त्यामागे निश्चित होती.

**प्रयोजन / हेतू**

अशा या ग्रंथालयांत असणारी पुस्तके प्रामुख्याने नाटकांचीच असत. गावातील लोकांसमोर, ग्रामदैवतासमोर आपली कला सादर करण्याच्या हेतूने ही नाटके बसवली जात. दरवर्षी नवीन नाटक बसवण्याचा प्रयत्न असे. लोकांचे मनोरंजन व्हावे, नवनवीन कलाकार आणि नवनवीन विचार या निमित्ताने समोर यावेत हा हेतू त्यांत असे. अशा ग्रंथालयांतील संहितांच्या पुस्तकांची संख्या नेमकी किती असे हे निश्चित सापडत नाही; परंतु गावातील हौशी मंडळीच्या आर्थिक क्षमतेवर हे बऱ्यापैकी अवलंबून असे एवढे मात्र निश्चित. मुळात अशा ग्रंथालयासाठी एखादी खास खोली वा ठिकाण राखीव असल्याचे फारसे आढळत नाही. गावातीलच एखाद्या व्यक्तीच्या घरात वा देवालयातील एखाद्या भागात या पुस्तकांसाठी जागा उपलब्ध करून दिली जात असे.

मुळात अशा संहितांची गरज वर्षातून एखाद-दुसऱ्या वेळीच भासत असल्यामुळे त्यासाठी फारशा जागेची गरज वाटत नसे. अशा ग्रंथालयांतील पुस्तकांचे कॅटलॉगिंग वा तत्सम नोंदणी केलेली आढळत नाही. सदर ग्रंथालयातील पुस्तके वापरणाऱ्या आणि हाताळणाऱ्या व्यक्ती गावातीलच ठराविक माणसे असत त्यामुळे त्यांना पुस्तकांची / ग्रंथसंहितांची व्यक्तीशः माहिती असे. याच कारणामुळे

कॅटलॉगिंग करण्याची पद्धत भासली नसावी. आजकाल ज्या पद्धतीने वाचनालयातून पुस्तके घरी नेण्याची व्यवस्था असते आणि त्यांची नोंद देखील केली जाते तसे त्याकाळी होत नसे. फक्त वाचण्यासाठी आणि वाचनाच्या आनंदासाठी ही पुस्तके घेऊन जाण्याचा प्रकार नसेच. या नाटकांच्या संहिता फक्त सादरीकरणासाठी म्हणूनच जमा केल्या जात असत त्यामुळे नाटक बसवण्याच्या वेळी सर्व मंडळी एकत्र जमत, संहिता निश्चित करत आणि नाट्यप्रयोग पूर्ण झाल्यानंतर पुन्हा ती संहिता ठेवून दिली जात असे.

**सहकार तत्वाचा अवलंब**

क्वचित प्रसंगी एखादी नाट्यसंहिता आपल्या ओळखीच्या व्यक्तीला वा शेजारच्या गावातील तत्सम हौशी नाट्यमंडळीला दिली जात असे. अशा वेळी त्याचा लेखी हिशेब क्वचितच ठेवला जात असे. सदर ग्रंथालयासाठी ग्रंथपाल अशी कुणीच व्यक्ती नसल्याने त्याचा पाठपुरावा करणे देखील कठीण होऊन जाई. त्याचबरोबर अन्य मुद्दा म्हणजे, गावात एकदा सादर केलेले नाटक पुन्हा लगेचच सादर केले जात नसे त्यामुळे त्या संहितेची नजिकच्या काळात लगेच गरज भासणार नाही असे वाटल्याने ती संहिता सहजपणे, गावाबाहेरील एखाद्या अन्य ओळखीच्या व्यक्तीला दिली जात असे. यातही बंधुभाव आणि आपलेपणा हाच शुद्ध भाव असे. मात्र अशी दिलेली संहिता अनेकदा परत येत असेच असेही नाही. बऱ्याच संहिता या पुन्हा माघारी येत नसत वा हरवत असत. आपापल्या कामात व्यस्त असलेली माणसेही काही दिवसात ती गोष्ट विसरून जात आणि अशा पद्धतीने अनेक संहिता ग्रंथालयाच्या संकलनातून कायमच्या गहाळ होत. अशा तऱ्हेने आजवर अशा वेगवेगळ्या गावांतील जुन्या हौशी नाट्यमंडळीच्या संकलनातून गहाळ झालेल्या संहिता म्हणजे गोमंतकीय हौशी नाट्यपरंपरेचे फार मोठे नुकसान म्हणावे लागेल.

नाटक बसवण्यासाठी संहितेचे 'खड्डे' करणे हा एक आगळावेगळा प्रकार आपल्याला गोव्याच्या नाट्यपरंपरेत पहावयास मिळतो. या 'खड्डे' करण्याच्या प्रक्रियेमुळे देखील अनेकदा पुस्तके फार मोठ्या प्रमाणात खराब होत असत. खड्डे करण्याच्या प्रक्रियेत, जे नाटक सादर करायचे आहे त्या नाटकाच्या संहितेच्या दोन प्रती आणल्या जात. प्रत्येक कलाकाराला त्याचे पात्र आणि संवाद पाठ करता यावेत यासाठी छापलेल्या मजकुराच्या / संवादाच्या पट्ट्या कापल्या जात आणि त्या-त्या कलाकाराला दिल्या जात. जे पान आडव्या पट्ट्यांच्या स्वरूपात कापले जाई त्याची मागील बाजू त्याच संहितेच्या दुसऱ्या प्रतीतून कापली जाई, प्रत्येक कलाकाराला

त्याचे-त्याचे संवाद अशा पट्ट्यांच्या स्वरूपात कापून दिले जात. त्या आधाराने प्रत्येक कलाकार आपापले संवाद तयार करत असे. खड्डे करण्यासाठी (पट्ट्यांच्या स्वरूपात कापण्यासाठी) वापरल्या जाणाऱ्या या दोन प्रतींव्यक्तिरिक्त एक तिसरी प्रत दिग्दर्शकासाठी आणली जात असे. त्यात कोणत्याही प्रकारची काटछाट केली जात नसे आणि त्याच्याच आधाराने संवादांची मालिका आणि क्रम लक्षात ठेवला जात असे. अशा या 'खड्डे' करण्याच्या प्रक्रियेमुळे अनेक संहिता खराब होत असत. त्यात पुन्हा नाटक बसवण्यासाठी असे हे 'खड्डे'देखील अनेकदा इतर हौशी मंडळी घेऊन जात असत. छापील संहितांप्रमाणेच हे खड्डे देखील कुणीतरी घेऊन गेल्याचे अनेकदा विस्मरणात जात असे आणि अशा नेलेल्या संहिता, खड्डे पुन्हा कधीच त्या ग्रंथालयात येत नसत. यातूनच अशा ग्रंथालयांचे अतोनात आणि कधीही न भरून निघण्यासारखे नुकसान झाले आहे असे म्हणावे लागेल.

**वाचनालय नव्हे... ग्रंथालय**

ग्रामीण स्तरावरील ही ग्रंथालये केवळ नाट्यसादरीकरणाच्या हेतूनेच निर्माण केली जात असत. त्यामुळे अशा संकलनाला 'वाचनालय' असे न म्हणता केवळ 'ग्रंथालय' हाच दर्जा देणे उचित ठरते. वाचन करण्याचे आलय (घर) म्हणजे वाचनालय अशी या शब्दाची फोड होते. ग्रामीण स्तरावरील या नाट्यसंहितांच्या संकलांचे केवळ *वाचन* करण्यासाठी म्हणून त्यांची निर्मिती मुळातच नव्हती, त्यातही, असे वाचन करावयाचे झाल्यास तशी स्वतंत्र जागाही त्याकाळी उपलब्ध नसायची. क्वचित वाचन करायचेच झाल्यास ते पुस्तक आपल्या घरी घेऊन वाचावे हीच एकमात्र सोय होती. म्हणून अशा ग्रंथसंकलनांना 'ग्रंथालय' म्हणणे संयुक्तिक ठरते. असा हा संग्रह ठेवण्यासाठी स्वतंत्र खोली उपलब्ध होत असे. मात्र बऱ्याच वेळा एखाद्या ठिकाणी त्यासाठी केलेली स्वतंत्र व्यवस्था म्हणजे त्या ग्रंथांचे घरच असे. त्या अर्थाने ग्रंथांचे आलय (घर) असे म्हणत या संकलनाला 'ग्रंथालय' म्हणणे तांत्रिकदृष्ट्या योग्य ठरते.

**योगदान**

या प्रकारच्या ग्रंथालयांच्या मदतीने अनेक गावात मनोरंजन आणि सेवा करण्याबरोबरच अनेक कलाकार, तंत्रज्ञ घडण्यासही मदत झाली परंतु त्याचबरोबर अनेक नवनवीन लेखकही उदयास आले. गोमंतकातील गावागावात नव्या नाट्यलेखकांनी आपापल्या शैलीत नाविन्यपूर्ण विषयांना स्पर्श करत वैशिष्ट्यपूर्ण

लेखन केले. प्रारंभी, पौराणिक कथानक असलेली आणि संगीत नाटकेच प्रामुख्याने सादर होत असत. परंतु कालानुरूप ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय विषय असलेली गद्य नाटकेही सादर होऊ लागली. कालानुरूप समाजाची अभिरुची बदलल्याने देखील हा फरक दिसून येतो. नवे काहीतरी निर्माण करण्याचा प्रयत्न म्हणून अशा पद्धतीचे लेखन झालेले पाहावयास मिळते.

**सद्य:स्थिती**

ग्रामीण हौशी नाट्यग्रंथालयांची परिस्थिती सद्य:स्थितीत काय आहे हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय ठरेल. परंतु, जुन्या काळी जेवढी ग्रंथालये उपलब्ध होती त्या तुलनेत आज अशा ग्रंथालयांची संख्या फार उणी असलेली दिसून येते. गोमंतकातील मडकई गावात अशा स्वरुपाचे ग्रंथालय आणि नाट्यसंहिता संग्रह आजही टिकून आहे. त्याचसोबत चेतकी, नागेशी, सांगे, कुमारजुवा अशा ठिकाणीही अशा स्वरुपाची ग्रंथालये जुन्या काळी होती अशी माहिती मिळते. मात्र सद्यस्थितीत त्यांची नेमकी अवस्था काय आहे हे पाहण्याची आवश्यकता आहे. बहुतांश ठिकाणी असे संग्रह विविध व्यक्तींच्या व्यक्तिगत संग्रहाचा भाग आहेत. जुन्या काळी पुस्तके ठेवण्यासाठी जागा नसल्याने आणि व्यक्तीश: त्यासाठी खर्च केल्याने संबंधित व्यक्ती सदर पुस्तके आपल्याच घरात ठेवत असत. परंतु त्यांचा वापर सर्वांसाठी म्हणून केला जाई हेही अधोरेखित करण्यासारखे आहे. मडकई गावातील असे हे ग्रंथालय बहुधा सर्वांत जुने आणि आजही टिकून असलेले म्हणता येईल. त्यासंदर्भात अधिक संशोधन करण्यास वाव आहे. अलीकडच्या काळात मनोरंजनाची साधने फारच झपाट्याने वाढल्यामुळे नाटकांचा पारंपरिक रसिकवर्ग खूपच उणावत चाललेला दिसतो. त्यातही नाटकांचे विषय काळाच्या ओघात बदलत गेलेले दिसून येतात. आजकाल फार्सिकल पद्धतीची आणि विनोदी स्वरूपाची नाटके रसिकांच्या अभिरुचीचा भाग बनत चालली आहे. हलकाफुलका विनोद आणि केवळ टाईमपास या हेतूनेही अनेक नाटके सादर होतात.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे गोवा मुक्तीनंतरच्या काळात तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर शासकीय ग्रंथालये / वाचनालये सुरू झाल्यामुळे अशा ठिकाणी आवश्यक त्या नाटकांच्या संहिता आजकाल सहजपणे उपलब्ध होऊ लागल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण पातळीवर सहकारी तत्त्वाने चालणाऱ्या अशा जुन्या हौशी संगीत नाट्यग्रंथालयांची संख्या हळूहळू कमी होत चालली आहे. जी मोजकी ग्रंथालये आजही आपले अस्तित्व टिकवून आहेत त्यांच्यासमोर आर्थिक

प्रश्नही फार मोठा आहे. जुन्या विरळ नाट्यसंहिता टिकवायच्या असल्यास त्यांच्या देखभाल आणि डागडुजीसाठी बराच खर्च येतो. आजही काही हौशी मंडळी हा खर्च करतात परंतु आवश्यक पाठबळ पुरेसे नाही असेच दिसून येते. गावातील जत्रांत सादर होणाऱ्या नाट्यप्रयोगांची संख्याही कमी होत चालली आहे. त्यांची जागा गायन, नृत्य यासारख्या सादरीकरणांनी घेतली आहे. त्यामुळे नाट्यसंहितांची गरजच मुळात कमी होत चालली आहे. क्वचित प्रसंगी जे नाट्यप्रयोग सादर होतात तेही अनेकदा सुप्रसिद्ध / सुपरिचित नाटकांचेच असतात. त्यामुळे त्या संहिता मिळणे फारसे कठीण ठरत नाही.

**समारोप**

ग्रामीण पातळीवर अशा हौशी नाट्यमंडळींनी आजवर जी ग्रंथालये चालू केली आणि टिकवली त्या ग्रंथालयांचे योगदान अनन्यसाधारण आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे अशा ग्रंथालयांनी ग्रामीण स्तरावर नाट्यकलेची वृद्धी होण्यास प्रचंड मदत केली. नाटक घराघरात आणि मनामनात पोहोचण्यास याच ग्रंथालयांची कामगिरी मोलाची ठरते. कला प्रदर्शित करण्याच्या हेतूने असो वा ग्रामदेवतेची सेवा करण्याच्या हेतूने, ग्रामीण स्तरावर सादर होणारी नाटके याच ग्रंथालयांमुळे शक्य होऊ शकली. या ग्रंथालयांच्या मदतीने सादर केलेल्या नाटकांमुळे अनेक उत्तम कलाकार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ आणि महत्त्वाचे म्हणजे जाणकार रसिक घडवले. वेगवेगळ्या निमित्ताने सादर होणाऱ्या विविध विषयांवरील नाट्यप्रयोगांच्या अनुभवातून समाजाचे प्रबोधनदेखील फार मोठ्या प्रमाणात शक्य झाले. समाजाची अभिरुची विकसित करण्याबरोबरच आवश्यक आणि योग्य विचार समाजापर्यंत पोचवण्याचे कार्य या ग्रंथालयांच्या मदतीने झाले.

गोमंतकाला लाभलेला नाट्यकलेचा वारसा टिकवण्यात या ग्रंथालयांचे योगदान अनन्यसाधारण आहे. संस्कृतीसंवर्धनाचे महत्त्वाचे काम करण्याबरोबरच या ग्रंथालयांच्या मदतीने वाचन संस्कृतीही जपली गेली. नाट्यसादरीकरणासाठी वाचन करावे लागे आणि दरवर्षी नवनवीन नाटक सादर करण्याच्या निमित्ताने अनेकविध नाट्यसंहिता वाचल्या जात. या वाचनामागील हेतू 'नाट्यप्रयोग सादरीकरण' हा जरी असला तरी त्यायोगे ग्रामीण स्तरावर माणसे मुबलक वाचन करीत हेही लक्षात घेण्याजोगे आहे. नाटक ही सामाजिक, एकत्रित येऊन सादर करण्याची आणि अनुभवण्याची कला असल्याने तिच्या माध्यमातून समाजाची वीण घट्ट बांधून राहते. नाटकाच्या सादरीकरणाच्या निमित्ताने समाजात विविध विषयांवर विविध स्तरांवर

चर्चा, विचारमंथन आणि सुधारणा होतात. अशा अनेक दृष्टीने विचार करता ग्रामीण नाट्यग्रंथालयांचे योगदान महत्त्वाचे आहे.

गोमंतकाच्या नाट्यचवळीत, ग्रामीण स्तरावरील हौशी नाट्यमंडळांनी चालवलेल्या नाट्यग्रंथालयाचे महत्त्वाचे योगदान आहे. आजही अनेक गावांतील अशा हौशी नाट्यग्रंथालयांत अनेक पुस्तके आणि दुर्मीळ संहिता आहेत. अशा संहिता आपल्या गावात आहेत याची माहिती नव्या पीढीला बहुतांश वेळा नाही असे चित्र अनेक ठिकाणी दिसते. ज्या ग्रंथालयांचे कामकाज आजही काही प्रमाणात चालू आहे त्यांना देखील आर्थिक मदतीच्या आधाराची फार मोठी गरज आहे. शासकीय स्तरावर वा बिगर सरकारी संघटनांच्या मदतीने अशा ग्रंथालयांचे पुनरुज्जीवन होणे गरजेचे आहे. गोमंतकातील हौशी नाट्यकलेचा वारसा टिकवणारा हा महत्त्वाचा दुवा सांभाळण्यासाठी कालसुसंगत, योग्य आणि त्वरित पावले उचलणे नितांत आवश्यक आहे.

■

**१२. प्रा. चिन्मय मधू घैसास**

गोवा विद्यापीठ, मराठी विभाग येथे साहायक प्राध्यापक, पणजी दूरदर्शन, आकाशवाणी केंद्राचे माजी वृत्तनिवेदक व भाषांतरकार. प्रकाशित ग्रंथ - ललित ग्रंथ एक, अनुवाद एक. साहित्य मंडळ, ठाणे संस्थेचा सावित्रीबाई फुले साहित्य भूषण पुरस्कारांसह एकून आठ पुरस्कार प्राप्त.

पत्ता : साहायक प्राध्यापक (मराठी), गोवा विद्यापीठ, ताळगाव,
गोवा - ४०३२०६.
संपर्क : ९८२३७२८६४०.

**१३. प्रा. डॉ. संजयकुमार करंदीकर**

प्राध्यापक आणि मराठी विभाग प्रमुख, द महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी ऑफ बरोडा, वडोदरा, गुजरात
संपर्क : ९९०९९१६९७८.

**१४. शाम बापट**

पूर्व विभागप्रमुख, पुराणेतिहास संस्कृत विश्वविद्यालय वाराणसी. अनेक राष्ट्रीय संगोष्टी मध्ये सहभाग. अष्टदश पुराण विमर्श, उपपुराण विमर्श, काशीरहस्यम् (पुराण) भगवद्‌गीता, योगगीता, गणेशपुराण इत्यादींचे प्रवक्ता.

पत्ता : आवास संकेत के २३/१९,
दूध विनायक, वाराणसी - २२१००१.
संपर्क : ९३३६३५१७७२.

**१५. चित्रा प्रकाश क्षीरसागर**

कवयित्री, सामाजिक कार्यकर्त्या. उद्योजिका. सहा पुस्तके प्रकाशित. दोन पुस्तकांचे संपादन. समाजकार्यासाठी अनेक पुरस्कार. पणजी आकाशवाणी, दूरदर्शन वर कवी संमेलनाचे आयोजन. बृहन्महाराष्ट्र मंडळ, दिल्लीच्या कार्यकारिणीवर गोव्यातून रिजनल सेक्रेटरी म्हणून पदभार.

पत्ता : एर्नेस्टिना बिल्डिंग, वोडलेम भट, तलैगाव, ता. तिसवाडी,
जि. उत्तर गोवा, पणजी गोवा - ४०३००२.
संपर्क : ९८५०८३२२९१.